अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. ६ जून २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २४७ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

सतत येणाऱ्या अपयशाला वैतागला, शिकाऊ डॉक्टरने गळफास घेतला

सुसाईड नोट : आई-वडिलांना सांगू नका, फक्त मामाला कळवा

सुराज्य/सोलापूर

येथील डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या बीडमधील एका विद्यार्थ्याने सोलापुरातील एका हॉटेलमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याने वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. एमबीबीएसच्या परीक्षेत सतत अपयश आले. त्याच्या नैराश्येतून त्याने आपले जीवन संपवल्याचे सांगण्यात येते. त्याच्या खिशात पोलिसांना चिठ्ठी सापडली असून आपल्या आत्महत्येची माहिती आई-वडिलांना सांगू नका. केवळ माझ्या मामाला कळवा,असे भावनाविवश ओळी त्याने सुसाईड नोटमध्ये लिहिल्या आहेत. सोमवारी सकाळी हा प्रकार उजेडात आला.

आकाश संतोष जोगदंड (वय २४, रा. चौसाळा, जि. बीड) असे आत्महत्या केलेल्या दुर्दैवी वैद्यकीय विद्यार्थ्याचे नाव आहे. त्याने आत्महत्येचा टोकाचा निर्णय का घेतला, याचे कारण लगेचच स्पष्ट होऊ शकले नाही. आकाश हा आसार मैदानावरील एका हॉटेलमध्ये उतरला होता. सकाळी उशिरापर्यंत त्याने खोलीचा दरवाजा न उघडल्याने आणि प्रतिसादही न दिल्याने हॉटेलच्या व्यवस्थापकाने पोलिसांना कळविले. पोलिसांनी येऊन बंद खोलीचा दरवाजा तोडला असता खोलीत आकाश छतावरील विद्युत पंख्याला गळफास घेऊन लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. कॉलेजमधील मित्रांना तो आपण गावाकडे असल्याचे तर गावाकडील लोकांना आपण सोलापुरातच असून शिक्षण घेत असल्याचे सांगितले होते. दरम्यान त्याने ३० मे रोजी रितेश हॉटेल येथील खोली भाड्याने घेऊन सोलापुरात राहण्यास होता. मध्यरात्री त्याने रूमचा दरवाजा आतून बंद केला आणि खोलीतील पाण्याचे नळ चालू ठेवले होते. टाकीतील पाणी संपल्यामुळे हॉटेलच्या कर्मचाऱ्याने सकाळी दरवाजाची बेल वाजवली. पण प्रतिसाद येत नव्हता. त्यामुळे याची माहिती फौजदार चावडीच्या पोलिसांना कळविण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी येऊन रूमचा दरवाजा उचकटला. तेव्हा आकाश जोगदंड याचा मृतदेह छताच्या पंख्या जवळील लोखंडी हुक्काला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. तर त्याच्या पलंगावर सुसाईड नोट आढळली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शासकीय रुग्णालयाकडे पाठवून दिला.भावी डॉक्टराने आत्महत्या केल्याचे वृत्त समजतात रुग्णालयातील डॉक्टरांनी रुग्णालयात गर्दी केली होती. या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली असून निरीक्षक विश्वनाथ सिद हे पुढील तपास करीत आहेत. मयत आकाश जोगदंड यांच्या पश्चात आई-वडील आणि बहीण असा परिवार आहे त्याचे वडील शेती व्यवसाय करतात. सोमवारी सायंकाळी सात वाजता शवविच्छेदन झाल्यानंतर आकाश जोगदंड याचा मृतदेह त्यांच्या नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला. यावेळी मयताचे आई, वडील, मामा आणि गावाकडील काही लोक आले होते.

बीडमधील तरुणाची सोलापुरात आत्महत्या

अपयशाने निराश होता...

मृत आकाश याने डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय महाविद्यालयात २०२० साली एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला होता. परंतु वारंवार परीक्षा देऊन अपयश येत होते. सलग तीन वर्षे अपयशीच ठरल्याने तो नैराश्येत होता, अशी माहिती सूत्रांनी दिली.

टेंभुर्णी परिसरातून अपहरण; दोन अल्पवयीन मुली ताब्यात

सोलापूर : टेंभुर्णी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून अपहरण करण्यात आलेल्या दोन अल्पवयीन मुलींना ग्रामीणच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने नवी मुंबईतून ताब्यात घेतले आहे. मागील वर्षी टेंभुर्णी हद्दीतून दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण करण्यात आले होते. त्या दोन अल्पवयीन मुलींना अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून फूस लावून पळवून नेल्याबाबतची मुलीच्या आईने पोलीस ठाण्यात दिली होती.

बुधवारपासून नवीन महसूल इमारतीमध्ये १७ शाखांचे कामकाज चालणार

सुराज्य/सोलापूर

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नवीन महसूल इमारतीचा लोकार्पण सोहळा पार पडला. जुने जिल्हाधिकारी कार्यालयातील १७ शाखांचे कामकाज बुधवार ७ जून पासून सात रस्ता येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीतून चालणार आहे. असल्याचे प्रशासनाच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे.

नवीन इमारतीमध्ये जिल्हाधिकारी अपर जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी (महसूल) तसेच सामान्य शाखा, (आवक व जावक टपाल), लेखा शाखा, गृह शाखा, जिल्हा खनिकर्म शाखा, ग्रामपंचायत शाखा, पाणी टंचाई शाखा, मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, राष्ट्रीय जिल्हा विज्ञान केंद्र, जिल्हा माहिती तंत्रज्ञान शाखा, अपर जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, जिल्हा पुनर्वसन शाखा, कूळ कायदा शाखा, नगर पालिका प्रशासन, आस्थापना शाखा, विधी अधिकारी, महसूल शाखा, नैसर्गिक आपत्ती शाखा, राजशिष्टाचार शाखा इत्यादी शाखाचे स्थलांतर झाले आहे. सर्व साहित्य नवीन कार्यालयात आले आहे. त्यामुळे नूतन महसूल भवनातून काम काज चालू होणार आहे. यांची शहर जिल्ह्यातील नागरिकांनी नोंद घ्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. मात्र संजय गांधी निराधार योजना शाखा, अभिलेख शाखा, अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, करमणूक कर शाखा, निवडणूक शाखा, भूसंपादन सर्व शाखा, रोजगार हमी योजना शाखा या पूर्वीप्रमाणेच जुने जिल्हाधिकारी कार्यालयातील ठिकाणाहूनच कामकाज चालणार आहे.

मोदींचे कवच महिला खेळाडूंना नाही तर बृजभूषणला आहे

आ.प्रणिती शिंदे यांची टीका

सुराज्य/सोलापूर

भाजपचे खासदार बृजभूषण सिंग यांच्यावर अनेक गंभीर गुन्हे आहेत. देशाचे नाव जगात उज्ज्वल करणाऱ्या अनेक महिला कुस्तीपटूवरच त्यांनी लैंगिक अत्याचार केल्याचे या महिला खेळाडू सांगत आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने त्याच्यावर गुन्हेही दाखल झाले आहेत. असे असूनही त्याला अटक होत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कवच या महिला कुस्तीपटू साठी नसून स्वतःच्या पक्षाच्या गुन्हेगार खासदार बृजभूषण सिंगला वाचवण्यासाठी आहे अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या कार्याध्यक्ष आमदार प्रणिती शिंदे यांनी केली.

महिला कुस्तीपटूवर लैंगिक अत्याचार करणारा आरोपी भाजप खासदार बृजभूषण सिंग अटक करण्याच्या मागणीसाठी प्रदेश महिला काँग्रेसच्या वतीने महात्मा गांधी पुतळा मंत्रालय मुंबई येथे प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली निदर्शने आंदोलन करण्यात आले.

कांदा अनुदानाच्या प्रस्तावाचे ऑडिट होईना; शेतकऱ्यांच्या पदरात अनुदान काही पडेना

सुराज्य/सोलापूर

सोलापूर बाजार समितीत ३८ हजारांहून अधिक कांदा अनुदानाचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्याच्या छाननीसाठी सहकार विभागाकडून ३ सहाय्यक निबंधकांसह एकूण ३५ अधिकारी व कर्मचाऱ्यांची टीम कार्यरत असताना तब्बल एक महिना झाला तरी दाखल कांदा अनुदानाच्या प्रस्तावाचे ऑडिट काही होईन अन् शेतकऱ्यांच्या पदरात अनुदान काही पडेना अशी गत कवडीमोल भावाने कांदा विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांची झाली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील कांदा अनुदानासाठी अर्ज केलेल्या शेतकऱ्यांचे प्रस्ताव सध्या तपासण्याचे काम ज्या त्या बाजार समितीमध्ये सुरू आहे. जवळपास ३८ हजार प्रस्ताव छाननी करण्याचे काम सुरू आहे. गेली एक महिना झाला कांदा अनुदानासाठी प्राप्त प्रस्तावाचे ऑडिट केले जात असल्याचे सांगण्यात येत आहे. हे ऑडिट कधी पूर्ण होणार आणि शेतकऱ्यांच्या पदरात हे अनुदान कधी पडणार अशी आस लावून शेतकरी बसले आहेत. मात्र ज्यांना या कामासाठी नियुक्त केले आहे. हे सरकारी कर्मचारी नेमके करता तरी काय हा प्रश्न पडला आहे वास्तविक पाहता

राज्यातील कांद्याचे दर कमी झाले कवडी मोल दराने कांदा विक्री करावा लागत असल्याने राज्यातील शेतकरी राजा अडचणीत आला. अडचणीत सापडलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल ३५० रुपये अनुदान देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केला. मुख्यमंत्र्यांच्या घोषणेनंतर म्हणजेच २६ मार्चनंतर केवळ पाच दिवसात सोलापूर बाजार समितीत ७ हजार ट्रक्समधून कांद्याची तब्बल ७० हजार क्विंटल आवक झाल्याचे दाखविण्यात आले. एका दिवसात १३५२ गाड्यांची आवक दाखविण्यात आली मुख्यमंत्र्यांच्या घोषणेनंतर सोलापूर बाजार समितीने दाखवलेली कांद्याची आवक ही पूर्णपणे बोगस असल्याची चर्चा होती. त्यामुळे तपासणी करताना अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे ऑडिटला उशीर लागत असल्याचे बोलले जात तपासणी करताना शेतकऱ्यांच्या पट्टीवर व्यापाऱ्यांचे शिक्के आहेत का ? व्यापाऱ्यांच्या पावती पुस्तकाची बाजार समितीच्या सेस विभागाकडील नोंदी आहेत का? बाजार समितीने परवाने रद्द केलेल्याही व्यापाऱ्यांचे प्रस्ताव आहेत ? यांची तपासणी करावी लागत आहे. हे करता असताना बोगस प्रस्तावाची पडताळनी करावी लागत असल्याने हा विलंब लागत असल्याचे बोलले जात आहे.

पडळकरांची जीभ घसरली, पवारांचा केला एकेरी उल्लेख

सुराज्य/सोलापूर

भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी रविवारी रात्री उशिरा दक्षिण मंद्रुप येथे झालेल्या एका कार्यक्रमात ज्येष्ठ नेते शरद पवार व आ.रोहित पवार यांच्याविषयी वादग्रस्त वक्तव्य केल्याने राजकीय क्षेत्रात नव्या वादाला तोंड फुटले आहे.

धनगर समाजाच्या वतीने पडळकर यांचा छोटेखानी सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पडळकरांनी यावेळी शरद पवारांचा एकेरी उल्लेख करत सडकून टीका केली. रोहित पवारांबाबत उल्लेख करताना 'माकड' म्हणत खिल्ली उडवली. शरद पवारांनी गेल्या वर्षी चौंडी येथे मस्ती केली, अशी टीकाही त्यांनी केली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्याबाबत इतका कळवळा होता तर शरद पवार हे यंदाच्या वर्षी चौंडी येथे का आले नाहीत. शरद पवार चार वेळा मुख्यमंत्री होते तसेच केंद्रात अनेक वर्षे सत्तेत होते,त्यावेळी चौंडी त्यांना आठवली नाही,असे स्पष्ट करून पडळकर म्हणाले की- शरद पवार यांना गेल्या वर्षी चौंडी गाव ताब्यात घ्यायचे होते. मात्र, हा प्रयत्न आम्ही हाणून पाडला. यासाठीच धनगर समाजाच्या परिवर्तनाचे केंद्र असणारे चौंडी सतत जागृत ठेवले पाहिजे. जेजुरी देवस्थानामध्ये अहिल्यादेवी होळकरांचा पुतळा बसवला. जेजुरी संस्थानने हा पुतळा बसवला. हे संस्थान होळकरांचे आहे. पवारांचा या संस्थानाशी काहीही संबंध नाही. होळकरांनी या जेजुरी मंदिराचा जीर्णोद्धार केला आहे, ही होळकरांची जहागिरी आहे, असे पडळकर म्हणाले.

रायगडावर दरड कोसळून सोलापुरातील शिवभक्ताचा मृत्यू

रायगड : रायगडावर चढत असताना दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेत एका तरूणाचा मृत्यू झाला आहे. प्रशांत अरूण गुंड (वय २८, रा. सोलापूर) असं मृत तरूण शिवभक्ताचं नांव आहे. शनिवारी ही घटना घडली.

मृत तरूण प्रशांत गुंड हा पायऱ्या चढून जात असताना महाव्दारानजीक पावसामुळे दरड कोसळली यात दगड अंगावर पडल्याने त्याचा मृत्यू झाला. तो पुण्यावरून आला होता. महाड रूग्णालयात त्याचा मृतदेह उत्तरिय तपासणीसाठी पाठवण्यात आलाय. सध्या रायगडावर गर्दी आहे. एकाच आठवड्यात झालेल्या तीन दुर्घटनेत तिघांचा मृत्यू झाला आहे.

महाभारतातील शकुनीमामा फेम गुफी पेंटल यांचे निधन

मुंबई : 'महाभारत' या लोकप्रिय मालिकेतील शकुनि मामाची भूमिका साकारणारे अभिनेता गुफी पेंटल यांचे आज सोमवारी ५ जुन रोजी निधन झाले आहे. वयाच्या ७८ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरु होता.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

मला वाटतं, मान्सून इकडून येईल !

कल्याण
447-58-800

मेन बाजार
489-10-488

नाथाभाऊंना स्वगृही येण्यासाठी भाजपने घातल्या पायघड्या

सुराज्य/मुंबई

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या आ. एकनाथ खडसे यांना भाजपचे राष्ट्रीय व सरचिटणीस विनोद तावडे यांनी घरवापसीची ऑफर दिली आहे.

तावडे यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात तर्कवितर्कांना उधाण आले आहे. तावडे यांनी मीडियाला दिलेल्या मुलाखतीमध्ये यासंदर्भात भाष्य केले. तावडे यांनी म्हटले की, मला असे वाटते की, नाथाभाऊंनी परत पक्षात आले पाहिजे. पक्षात अशाप्रकारच्या लिडरशीपची गरज आहेच. खडसे यांना ग्रामीण महाराष्ट्रा ची चांगली जाण असून त्यांच्यासारखा नेता भाजपमध्ये असावा. त्यांच्यासारख्या ज्येष्ठ लोकांनी यावे पण नुसते येताना नाथाभाऊ ज्या स्पष्टपणे बोलतात, तसे अपेक्षित नसेल. पण जी-जी माणसे पक्षात आली पाहिजे असे आम्हाला वाटते त्यात नाथाभाऊ आहेत. विनोद तावडे यांच्या या वक्तव्यामुळे भाजपमध्ये अंतर्गत स्तरावर वेगळ्याच हालचाली सुरू आहेत का, अशी शंका अनेकांच्या मनात उत्पन्न झाली आहे. खडसे यांची भाजपमध्ये येण्याची इच्छा असेल, तर फडणवीस हे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि स्थानिक नेत्यांशी चर्चा करून उचित निर्णय येतील. पण खडसे यांना भाजपच्या शिस्तीचे पालन करावेच लागेल, असेही विनोद तावडे यांनी म्हटले. परंतु, माझे एकनाथ खडसे किंवा पक्षश्रेष्ठींशी माझे बोलणे झालेले नाही किंवा त्यांना प्रस्ताव दिलेला नाही, अशी पुस्तीही विनोद तावडे यांनी जोडली.



फडणवीस-खडसे वाद

राज्यात भाजपची सत्ता येईपर्यंत म्हणजे २०१४ पर्यंत एकनाथ खडसे हे महाराष्ट्र भाजपचा प्रमुख चेहरा होते. विधानसभेची निवडणूक जिंकल्यानंतर खडसे यांच्याच गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ पडेल, अशी अटकळ बांधली जात होती. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तुलनेत नवख्या असलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मुख्यमंत्रीपदाची धुरा दिली. तेव्हापासून फडणवीस आणि खडसे यांच्यात वाद सुरु झाले.

भोसरी जमीन गैव्यवहार प्रकरण अंगलट आले

फडणवीस मुख्यमंत्री असताना भोसरी जमीन गैरव्यवहार प्रकरणात खडसे यांच्यावर गंभीर आरोप झाले. त्यामुळे खडसे यांना मंत्रिपद सोडावे लागले. त्यानंतर खडसे भाजपमधून बाजूला सारले गेले. या सगळ्या पार्श्वभूमीवर खडसे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. तेव्हापासून खडसे यांनी फडणवीस यांच्यावर अनेकदा तिखट शब्दांत टीका केली. तावडे यांचे नाथाभाऊंना स्वगृही येण्याचे आमंत्रण देणे म्हणजे फडणवीस यांना टार्गेट करण्याचा हा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.

महासत्ताकच्या दिशेने

भारताची वाटचाल महासत्ताकच्या दिशेने सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. अर्थतज्ज्ञांमधूनही तसाच सूर उमटत आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून आणि ७५ वर्षे पूर्ण झाली. आज जग जेव्हा या दोन्ही भारताकडे पाहते, तेव्हा त्यात जमीन अस्मानाचा फरक जाणवतो. एकीकडे भारतीय अर्थव्यवस्था जीडीपी वाढीमुळे जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असल्याचे चित्र समोर येत आहे. भारताचा जीडीपी वाढीचा वेग अपेक्षेपेक्षा वेगाने जात आहे. तर अमेरिकेची अर्थव्यवस्था कर्ज मर्यादेमुळे बेजार झालीय, तर युरोपातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था जर्मनीही मंदीमध्ये लोटली गेलीय. त्यामुळे भारताला महासत्ता होण्याच्या दिशेने मार्गक्रमण करण्याची ही नामी संधी आहे. नॅशनल स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटने जाहीर केलेल्या जीडीपी वाढीच्या आकड्यांनुसार जानेवारी ते मार्च या कालावधीत जीडीपी वाढ ६.१ टक्के राहिली आहे. तर आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये जीडीपी वाढ ७.२ टक्क्यांपर्यंत होती. भारताच्या वाढत्या आकडेवारीने जगाला चकीत केले आहे. त्याचवेळी शेजारील पाकिस्तानची अवस्था बिकट झाली आहे. पाकिस्तानच्या जीडीपी वाढीचे अंदाजित आकडे वाढण्याऐवजी कमी करावे लागलेत आणि पाकिस्तानची सरकारी तिजोरी रिकामी झालीय. तर पाकिस्तानातील महागाईचा दर ५५ वर्षांच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचला आहे. सकल देशांतर्गत उत्पादन म्हणजेच जीडीपीचे आकडे देशाच्या अर्थव्यवस्थेच्या स्थितीचे वर्णन करतात. देशाच्या आर्थिक आरोग्याचे मोजमाप करण्याचा हा एक मार्ग असतो आणि राष्ट्रीय सांख्यिकी संस्था वर्षातून चार वेळा जीडीपीची आकडेवारी जाहीर करते. डेटा खासगी आणि सरकारी

गुंतवणुकीचा दर, उत्पादन दर, कृषी विकासदर इत्यादी दर्शवितो. राष्ट्रीय सांख्यिकी संस्थेने ३१ मे रोजी मार्च तिमाहीचे जीडीपीचे आकडे जाहीर केले. जीडीपी वाढीचा दर ६.१ टक्के आहे. फेब्रुवारीमध्ये मार्च तिमाहीसाठी जीडीपी वाढीचा अंदाज ५.१ टक्के होता, जो १ टक्के बिंदूचा फरक दर्शवितो. आर्थिक वर्ष २०२३ साठी जीडीपी अंदाज ७ टक्क्यांवरून आता ७.२% इतका वाढला. कृषी क्षेत्रातील विकास दर ५.५%, हॉटेल उद्योग ९.१% आणि बांधकाम १०.४% आहे. त्याचप्रमाणे गुंतवणुकीचा दर १८.३% आणि उपभोग १३.४ टक्क्यांनी वाढला आहे. त्याचबरोबर सरकारने वित्तीय तूट नियंत्रित करण्याचे लक्ष्य गाठले आहे. आर्थिक वर्ष २०२३ मध्ये सरकारने ६.४% च्या वित्तीय तुटीचे लक्ष्य गाठले आहे, जे मागील वर्षीच्या ६.७१% पेक्षा चांगले आहे. दुसरीकडे भारताचा किरकोळ चलनवाढीचा दर एप्रिल २०२३ मध्ये ४.७ टक्क्यांवर आला. महागाईचा हा आकडा १८ महिन्यांतील नीचांकी पातळीवर आला आहे. परकीय चलनाच्या साठ्याच्या बाबतीत भारत मजबूत स्थितीत आहे. ताज्या आकडेवारीनुसार, भारताचा परकीय चलन साठा ५९३.४७७ अब्ज डॉलर आहे. २०२२ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था इतर देशांच्या तुलनेत सर्वात वेगाने वाढत होती. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने प्रकाशित केलेल्या आकडेवारीच्या आधारे, भारतीय अर्थव्यवस्थेचा आर्थिक वर्ष २०२२ मध्ये ९.१ टक्के दराने वाढ झाली. त्याचप्रमाणे आपण जगभरातील मोठ्या देशांच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास या काळात ब्राझीलचा विकास दर २.९%, जपानचा १.१%, ब्रिटनचा ४% आणि अमेरिकेचा २.१% होता. भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचे जगभरातून कौतुक होत आहे. गेल्या १० वर्षांत भारत झपाट्याने बदलला आहे. एका दशकापेक्षा कमी कालावधीत भारताने जगात आपले स्थान मजबूत केले आहे. अर्थव्यवस्था आणि बाजाराच्या आघाडीवर भारतातून महत्त्वाचे सकारात्मक परिणाम आले आहेत. २०१३ च्या तुलनेत भारत पूर्णपणे वेगळा आहे, असेही अमेरिकन ब्रोकरेज फर्म मॉर्गन स्टॅनले रिसर्चने म्हटले आहे. जगात केव्हाही मंदी येऊ शकते, असे काही अर्थतज्ज्ञ म्हणाले होते. अमेरिका, युरोप खंडातील देश मंदीच्या कचाट्यात सापडले आहेत. आखाती देश आणि भारत याठिकाणी मंदीची झळ बिलकूल दिसत नाही. महागाई चक्र भारतात फिरत आहे पण मंदी नाही, ही भारतासाठी विशेष बाब म्हणावी लागेल. चीनसुध्दा आर्थिक मंदीचा सामना करत आहे. पाकिस्तान स्वतः च्या मरणारे मरत आहे. साऱ्या विश्वात जगज्जेता समजल्या जाणाऱ्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन हे एका उच्चस्तरीय परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदींची प्रतीक्षा करत होते. यावरून भारताची ताकत किती वाढली आहे हे लक्षात येते. सरकारच्या अर्थव्यवस्थेवर मोदींचे जबरदस्त नियंत्रण आहे. सरकारचा खर्च वाढता असेल पण एका पैशाचाही भ्रष्टाचार नाही. आर्थिक महासत्ताक झाल्यास कुठलाही देश आपल्याकडे वाकड्या नजरेने पाहू शकणार नाही.

शिवराज्याभिषेक

विश्वरूपी राज्याभिषेक

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकद्वारे घटनात्मक शासनव्यवस्थेची निर्मिती करून स्वराज्याला विश्वरूपी दर्जा प्राप्त करून दिला. छत्रपती शिवाजी महाराज सर्वकालीन सर्वश्रेष्ठ राजे होत. किल्ले रायगडावरती ६ जून १६७५ रोजी साजरा करण्यात आलेला शिवराज्याभिषेक सोहळा म्हणजे स्वराज्याची मंगल पहाट होय. आज ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. आज सर्वत्र शिवराज्याभिषेकोत्सव दिन साजरा होत आहे. भारतासाठी नव्हेतर उभ्या जगासाठी हा दिवस भाग्यदिन होय.

छत्रपतींनी स्वराज्य हे जागतिक कीर्तिचे शासन व्हावे म्हणून दीपवून टाकणारा राज्याभिषेक सोहळा संपन्न केला. गागाभट्ट यांनी राजमुकुट छत्रपतींच्या डोक्यावर ठेवला व 'छत्रियकुलावंतस सिंहासनाधिश्वर श्री शिवछत्रपती यांचा विजय असो' असा जयघोष केला. शनिवार दि. ६ जून १६७४ रोजी पहाटे पाच वाजता छत्रपती सिंहासनारूढ झाले. किल्ले रायगडावरती एक लाख लोक राज्याभिषेक सोहळ्यासाठी हजर होते. सर्वसामान्य रयत आपल्या राजाचा सोहळा पाहण्यासाठी आनंदाने किल्ल्यावरती पोहचली होती. देश विदेशातील लोक मोठ्या प्रमाणात हजर होते. दिव्यत्वाचा, अद्भुत प्रतिभेचा, अफाट सामर्थ्याच्या साक्षात्काराची घटना म्हणजे राज्याभिषेक दिन होय. छत्रपतींचे हे शौर्य म्हणजे भावी पिढीसाठी कोरली गेलेली प्रेरणागाथाच होय. शिवराज्याभिषेक शकाचा प्रारंभ झाला. भारत देशामध्ये नवी पहाट उगविली. स्वराज्याची ख्याती सर्वदूर पसरली. गागाभट्टाने स्वातंत्र्यासाठी स्वतः ग्रंथ तयार केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी अवघ्या विश्वाने वंदन करावे असे शौर्य गाजविले. त्यांच्या अलौकिक कार्य कर्तव्याने संपूर्ण विश्वाची अस्मिता जागृत झाली. छत्रपतींनी एका सार्वभौम स्वराज्यसत्तेची समाजहितकारक मूल्ये रुजविण्यासाठी राजसिंहासन निर्माण केले. काळ, आकाश आणि जमीन यांच्या सीमा जोडणारे आदर्श राजे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होत हे सिध्द झाले. गंगासागरच्या उंच मनोऱ्यावर हिंदवी स्वराज्याचे भगवे निशाण फडकत होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी शिवराई व होन अशी खास नाणी सुरू केली. या नाण्यांवर त्यांनी 'राजा शिवछत्रपती' अशी अक्षरे कोरली. ही नाणी म्हणजे स्वराज्याच्या उत्कर्षाचा परमोच्च बिंदू होय. आंतरराष्ट्रीय मान्यतेस पात्र अशी नाणी तयार करण्यात आली. टाकसाळी, दुष्काळाचे निर्मूलन, व्यवस्थापन, सैन्य व्यवस्था, दळणवळण व्यवस्था या गोष्टीकडे विशेष लक्ष देण्यात आले. स्वराज्य रक्षणासाठी व्यापक योजना आखण्यात आली. जगातील विविध ठिकाणाहून आलेल्या प्रतिनिधींनी छत्रपतींना नजराणे भेट दिले.

छत्रपती शिवाजी महाराज हे अष्टप्रधान मंडळ निर्माण करून त्याव्दारे शासनव्यवस्था चालविणारे जगातील पहिले राजे होत. यातून त्यांनी जगामध्ये एक नवीन शासनव्यवस्था निर्माण केली. छत्रपतींचे अष्टप्रधान मंडळ म्हणजे श्रेष्ठ प्रशासनाचे आदर्श रूप होते. अष्टप्रधान मंडळाची संहिता तयार करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंत्रिमंडळाच्या धरतीवरती आज जगभरातील अनेक देशामध्ये शासनव्यवस्था चालताना दिसते आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची स्वतंत्र अशी शासकीय स्वराज्यमुद्रा होती.

प्रतिपच्चंद्र लेखेव वर्धिष्णू विश्ववंदिता ।
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्राभद्राय राजते !

या राजमुद्रेचा आशय तो असा प्रतिपदेच्या चंद्रकलेप्रमाणे शहाजीपुत्र शिवरायांची सत्ता दिवसेंदिवस वाढत जावो आणि ती विश्ववंदिता होवो. ही मुद्रा भले करण्यासाठी विलसित होवो शहाजी राजे यांचे सुपुत्र छत्रपती शिवाजी महाराज यांची ही मुद्रा आहे. ही मुद्रा लोककल्याणार्थ शोभत आहे. चंद्रकोर जशी वाढत जाते तशी ही मुद्रा ही अभिवृध्दी पावणार आणि चंद्रकोर जशी लोकपूजित होते. तशीच मुद्राही सर्वमान्य होणार. अशा प्रकारे अतिशय सुंदर मजकूर या स्वराज्य मुद्रेत आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकाच्या निमित्ताने स्वराज्याची घटना तयार केली. त्यामुळे स्वराज्याला संविधानात्मक दर्जा प्राप्त झाला. शिवराज्याभिषेक कल्पतरू, लेखनप्रशस्तो, राज्यव्यवहार कोष या ग्रंथांची निर्मिती झाली. मराठी भाषेला व लेखन पध्दतीला वैभव प्राप्त झाले. डोळ्यांचे पारणे फेडणारा हा राज्याभिषेक सोहळा इतिहासाला कलाटणी देणारा ठरला. 'भगवा ध्वज' हा स्वराज्याचा राष्ट्र ध्वज होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी भगव्या ध्वजाला राष्ट्रीयत्व दिले. छत्रपतींच्या स्वराज्याचा भगवा ध्वज स्वाभिमानाचे प्रतीक होय. या निमित्ताने स्वतःचे अधिकार व सामर्थ्य यांचे द्योतक म्हणून 'राज्याभिषेक शक' या नावाची स्वतंत्र कालगणना सुरू केली. छत्रपतींनी स्वतःचा राजशक सुरू केल्यामुळे अखिल हिंदुस्थानात स्वतंत्र शासन व्यवस्थेची निर्मिती झाल्याचे जाहीर झाले. त्यासाठी 'करण कौस्तुभ' नावाचा ग्रंथ लिहिला. छत्रपती शिवाजी महाराजांनंतर होऊन गेलेल्या राजांनी हाच राजशक चालू ठेवला. राजपदाला लोकप्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी छत्रपतींनी ही कालगणना सुरू केली. यातून एक स्वतंत्र शासन निर्माण झाल्याचे जाहीर केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रशासकीय अधिकारी, संरक्षक दल, अष्टप्रधान मंडळ व सैनिक यांना खास गणवेश दिले. छत्रपती शिवाजी महाराजांनी शौर्य व कर्तबगारी गाजविणाऱ्या सैनिकांचा मान-सन्मान व त्यांना पदव्या देऊन गौरविले. तराजू हे चिन्ह न्यायी राजा म्हणून दर्शित करते.

राज्यकारभाराचे प्रतीक किंवा न्यायाचे प्रतीक या अर्थी सोन्याचा तराजू एका सोन्याच्या दांडीला अडकवून छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहासनामागे एक सेवक धरून उभा राहात असे. हे शिक्षा चिन्ह फक्त छत्रपतीच वापरीत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहासनावरती छत्राकृती छत्र किंवा घुमट असे. छत्रपतींच्या छत्राची काठी सोन्याची किंवा चांदीची असून त्यावरील छत्री रेशमी, मखमली, उंची कापडाची, जरीने कलाकुसर केलेली असे. त्याला मोत्याची झालर लावलेली असे. छत्रपतींच्या राज्यभिषेकाच्या वेळी सोन्याचे छत्र धरले. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यभिषेकासाठी ३२ मण सुवर्णाचे सिंहासन बनविले.हेव्री ऑक्झिडन हा

इंग्रज अधिकारी राज्याभिषेक सोहळ्यासाठी किल्ले रायगडावर हजर होता. त्याने त्या दिवसाचे वर्णन केले आहे ते असे. ६ जून १६७४ या दिवशी मी दरबारात गेलो. छत्रपती एका भव्य सिंहासनावर बसले होते. उत्तमोत्तम वस्त्रालंकार परिधान केलेले सरदार, सेनापती आपआपल्या मानाप्रमाणे उभे होते तर काही बसले होते. सिंहासनाच्या दोन्ही बाजूला सुशोभित केलेले भाले उभे केले होते. भाल्याच्या टोकावर सत्ता आणि अधिकार यांची निदर्शक चिन्हे होती. उजवीकडील झाल्यावर दोन मोठे मासे होते. त्यांची डोकी सोन्याची होती. डावीकडील भाल्यावर घोड्याच्या पुष्कळ शेपट्या होत्या. एका रत्नजडित भाल्याच्या टोकावर सोन्याचा एक तराजू होता. हा तराजू म्हणजे न्यायाचे द्योतक होते. वाद्याच्या दोन्ही बाजूला दोन लहान हत्ती आणि सोनेरी लगाम व मौल्यवान खोगीर वगैरे घातलेले दोन उमदे घोडे होते. ते घोडे व हत्ती पाहून आम्हांस कौतुक वाटले, अशा अवघड गडावर ते कसे आणले गेले. दि. २६ जानेवारी २०१८ रोजी प्रजासत्ताक दिनी दिल्ली येथील राजपथावर एकूण तेवीस चित्ररथांचे सादरीकरण झाले. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा या महाराष्ट्राच्या चित्ररथाचा प्रथम क्रमांक मिळाला.

- डॉ. मधुकर जाधव, कोल्हापूर.

टुडेज् ब्लॉग

जेणे पंढरीसारखाच आपुला, धामणगाव केला ।

वैकुंठाधिपती श्री विठ्ठलसखा । सोयरा जोडियेला जो का भक्त विरक्त भूतळवटी, विख्यात हा बोधला । त्या श्री संत माणकोजी चरणी साष्टांग मी घातीला । संत माणकोजी महाराज यांचा अवतार श्री क्षेत्र धामणगाव येथे इ. स. १६०४ ला झाला. त्यांच्या वडिलांचे नाव 'भानजी जगताप' तर आईचे नाव 'पार्वती' असे होते.

संत माणकोजी महाराजांचे वडील भानजी जगताप हे सासवडवरून धामणगावी वास्तव्यास आले. त्यांना वारकरी संप्रादयाची ओढ लागली. तिथेच धामनगावची पाटीलकी मिळाली व शिवाजी महाराज व माणकोजी महाराज अशी दोन मुले जन्माला आली. संत माणकोजी महाराजांच्या अंगी अफाट शक्ती असल्याने त्यांना बालवयातच वीरता प्राप्त झाली होती. संत माणकोजी महाराज पंढरपूरच्या पांडुरंगाच्या भेटीसाठी गेले असता सलग १४ दिवस भजन केल्यानंतर त्यांना साक्षात भगवान पांडुरंगाने दर्शन देऊन 'एकांती' 'बोध' दिला होता. म्हणून त्यांचे आडनाव जगताप ऐवजी 'बोधले' पडले. 'बोधला म्हणे, देवा तू मज बोधिले । आवडीने ठेविले नाम माझे ।। माणकोजी महाराजांच्या धर्मपत्नी ममताई होय. महाराजांना तीन लेखमोजी महाराज, यमाजी महाराज, विठोजी महाराज अशी त्यांची नावे होय. माणकोजी महाराजांचे अंगी दानशूरपणा होता. त्यांनी आपल्या जवळील सर्व धान्य आसपासच्या खेड्यातील गोरगरीबांना वाटून टाकले होते. संत माणकोजी महाराजांची भक्ती पाहून पांडुरंगाने आषाढीवारीला स्वतः धामणगावला येण्याचे वचन दिले व त्यांना वैशाख वारीसाठी पंढरपूरला येण्यास सांगितले. या वारीस 'देवलुटी वारी' असे म्हणतात. माणकोजी महाराजांच्या किर्तनामध्ये पांडुरंग स्वतः टाळ घेऊन उभे असत. त्यामुळे आजही या परंपरेतील कीर्तनकार हे कीर्तन सुरू करताना अगोदर मागे नमस्कार करतात व किर्तनास आरंभ करतात. माणकोजी महाराजांच्या अनेक शिष्यपरंपरा आहेत. त्यामध्ये गोपालबोध मळगांवकर सावंतवाडी, मल्हारबाबा खर्डेकर, भजलिंग महाराज करकंब, विश्वनाथ महाराज पेठ नागपूर इत्यादी प्रमुख शिष्य परंपरा आहेत. तसेच शेतकरी कुटुंबातील पापरी या गावातील गंगूबाईचे वर्णन फारच अद्भूत असे आहे. स्वतः भगवान पांडुरंग गंगूबाईचे रूप धारण करून पतीला भाकरीचे टोपले शेतात नेऊन जेवू घालण्याची आख्यायिका प्रसिध्द आहे. संत माणकोजी महाराजांना 'नवनाथांचा साक्षात्कार' झाला होता. नवनाथांनी महाराजांना ९ वस्तु देऊन 'जोग' घेण्याचा मंत्र दिला होता. आजही या जोगाची परंपरा धामणगावात चालू आहे. संत माणकोजी महाराजांची सून 'भागीरथी' आईसाहेबांना भगवान पांडुरंगाने साक्षात्कार करून त्यांच्या पोटी जन्म घेतला होता. शेवटी माणकोजी महाराजांनी संजीवन समाधी घेण्याचा निर्णय घेतला. श्री क्षेत्र धामणगाव येथे धर्मराजने स्थापन केलेल्या धर्मलिंगेश्वराजवळ संजीवन समाधी करिता स्थान निश्चित केले. भगवान पांडुरंग स्वतः हजर होते. माणकोजी महाराजांनी त्याठिकाणी मांडी घालून योगमुद्रा लावली. रामकृष्ण हरी भजनाचा गजर झाला. तीनही मुलांनी पूजा केली. हा दिवस म्हणजे ज्येष्ठ वद्य तृतीया, गुरुवार असून इ. स. ३१ मे १६९४ या दिवशी महाराजांनी संजीवन समाधी घेतली. ६ जून २०२३ रोजी स. १० ते १२ या वेळेत सद्गुरू प्रभाकरदादा बोधले महाराज यांचे समाधीसोहळ्यानिमित्त स्थळ श्री क्षेत्र धामणगाव ता बार्शी येथे पुष्पवृष्टीचे कीर्तन होईलु व नंतर महाप्रसाद होईल.

- डॉ. जयवंत महाराज बोधले.

जन्म हा अखेरचा

प्राणानुग्रहस्थल - १

जपात सवलत मिळेल. पण लाभात घटदेखील होईल. बारा कोटी जप कुंडलीतील ग्रहांच्या शुध्दीसाठी आहे तर पुढचा एक कोटी जप भगवद्प्राप्तीसाठी आहे. श्वासासोबत मंत्रजप होत राहिला तर दररोज २१,६०० याप्रमाणे तेरा कोटी जप होणे अशक्य नाही.

प्राणानुग्रह याचा एक अर्थ आहे प्राणावर अनुग्रह करणे हा. आजवर प्राण सरळ वाहत नव्हता. प्राणायामामुळे सुसूत्रता आली तो सुधारला. हा झाला प्राणावर अनुग्रह. दुसरा अर्थ आहे नियंत्रित झालेला प्राण आपल्याला भगवंताकडे येऊन जातो. हा प्राणाने आपल्यावर केलेला अनुग्रह होय. प्राण नियंत्रित झाला की कन नियंत्रित होते. कारण प्राण हा मनाचा अध्यक्ष आहे. इंद्रिये मनाचा आदेश पाळतात तर मन प्राणाचा आदेश पाळते. पशु-पक्ष्यांच्या शरीरात जीवात्म्याचे मन शुध्द झाले नाही. म्हणून परमेश्वराने त्याला मानवशरीर दिले. मानव याचा अर्थ आहे - 'मत्वा करोतिती मानवः ।' जो विचारपूर्वक कार्य करतो तो 'मानव' होय. जो विचार करु शकत नाही तो मानव नव्हे. परमेश्वराने मानवाला सर्वाधिक आयुष्य दिले आहे. सांसारिक सुखे भोगण्यासाठी साठ वर्षे आणि मनाच्या शुध्दीसाठी चाळीस वर्षे. संसारातील सुख-दुःखे भोगून मन अत्यंत मलिन झालेले असते. साठ वर्षातील राग-द्वेषांमुळे आलेले मालिन्य दूर करण्यासाठी चाळीस वर्षे लागतात. शरीर पूर्ण सुदृढ होण्यासाठी वीस वर्षे लागतात. पुढील चाळीस वर्षे शरीर-मन-मलिन करण्यासाठी आणि शेवटची चाळीस वर्षे मनशुध्दीसाठी. असा हा शंभर वर्षाचा हिशेब आहे.

इंद्रियांना सुधारणे म्हणजे काय? तुम्ही डोळे सुधारु शकता? कान सुधारु शकता? ते तर वृध्दत्वामुळे क्षीणच झालेले असतात. परंतु इंद्रियांद्वारे व्यवहार करणारे मन सुधारले जाऊ शकते. ज्याचे मन सुधारते, त्याचे सारे जीवन सुधारते. मन हेच बंध-मोक्षाचे कारण आहे. तुम्हाला येथे शिवानुभव मंगल भवनात आणणारे तुमचे मनच आहे आणि कशाला उगीच झोपमोड करायची, असे म्हणून घरी बसवणारे तुमचे मनच होय. तुम्ही इथे आला, यावरुन तुमच्या मनाला सुधारण्याची इच्छा दिसते. आपल्या सुधारण्याची संधी मन देत आहे की नाही, हे दैनंदिन व्यवहारावरुन आपल्याला लक्षात येते. ज्या क्षणी मन सुधारते त्या क्षणी तुमच्या जीवनाचे सार्थक होते. मन नियंत्रित करण्यासाठी प्राणनियंत्रण करावे लागते. तुम्ही प्राणावर अनुग्रह कराल तर प्राणाचा तुमच्यावर अनुग्रह होईल. प्राणायामात वायू आत खेचून कुंभक करावा लागतो. तीच क्रिया शिवयोगी कशी करतो ते येथे सांगितले आहे.

(क्रमशः) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.

जनमानस

आंदोलनांची दखल न घेता ते चिरडण्याचा नवा फंडा

सर्वशक्तिमान म्हटले जाणारे देशातील सरकार, महिला कुस्तीपटूंनी भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषणसिंह यांच्यावर अनेक महिला कुस्तीपटूंनी लैंगिक शोषणाचे आरोप करून दिर्घकालानंतरही त्या आरोपांना सामोरे जाण्याचे धारिष्ट्य दाखवित नाही ना त्याची दखल येऊ इच्छित आहे.

आम्ही महिलांचा नेहमीच सन्मान राखतो असे म्हणवणारे सरकार ब्रिजभूषणसिंह यांची चौकशी करून महिला कुस्तीपटूंचे आरोप खोटे किंवा राजकीय हेतूंनी प्रेरित आहेत हे सिध्द करण्यासाठी चालढकल करीत आहे.

त्यामुळेच महिलांनी केलेल्या आरोपांमध्ये निश्चितच काही तथ्य आहे असा समज पसरला आहे. कुस्तीगीरांनी केलेले आंदोलन दिल्ली पोलिसांनी मारहाण करून चिरडून टाकले. जे खेळाडू देशाच्यावतीने आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी होऊन देशासाठी पदक मिळविण्यासाठी जी काही मेहनत घेतात त्यांच्याविषयी सहृदयता दाखविली जात

नाही याचे खरे कारण समोर आणले जात नाही, तोपर्यंत देशातील इतर खेळाडूंना आपल्यावर अशा प्रकारचे अन्याय होऊ शकतात. अशा भीतीदायक वातावरणात देशासाठी सर्वार्थाने लढणारे खेळाडू कसे काय धजावतील?

खेळ आणि खेळाडूंविषयी सरकारला जर आत्मियता असती तर महिला कुस्तीपटूंनी महिनाभर छेडलेल्या आंदोलनाची दखल घेत त्यावर तातडीने उपाययोजनांची कारवाई केली असती. नेहमीच या ना त्या कारणाचे निमित्त साधून आपल्या मनातील विचार जनतेसमोर मांडणाऱ्या सरकारी नेतृत्वापर्यंत ह्या आंदोलनाची झळ पोहोचली नाही असेही म्हणता येणार नाही. म्हणजेच शेतकऱ्यांच्या आंदोलनाप्रमाणे यापुढे केली जाणाऱ्या आंदोलनांची दखल न घेता ती चिरडून टाकण्याचा नवा प्रकार सुरू झाला आहे असे म्हणता येईल. हा प्रकार कितीकाळ सहन करायचा हे जनताच ठरविणार आहे हे सर्वांनी लक्षात ठेवलेले बरे.

- स्नेहा राज, गोरेगांव.

चित्रपटसृष्टीचे ममत्त्व हरपलं

हिंदी आणि मराठी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचना लाटकर यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीतील एका पर्वाचा शेवट झाला आहे. सोमवारी त्या अनंतात विलीन झाल्या. सहजसुंदर अभिनय, आई-वहिनी, बहिणीचे ममत्व रुपेरी पडद्यावर जिवंत करणाऱ्या अभिनेत्री म्हणून त्यांची ख्याती होती. सुलोचना दीदी यांनी चित्रपटसृष्टीत दिलेल्या योगदानासाठी १९९९ मध्ये पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात आले होते. त्याशिवाय, २००४ मध्ये फिल्मफेअर जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला. २००९ मध्ये महाराष्ट्र सरकारने 'महाराष्ट्र भूषण' या राज्याच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. बेळगावमध्ये ३० जुलै १९२८ रोजी जन्म झाला. सुलोचना दीदी यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीची सुरुवात १९४६ पासून केली. १९४६ ते १९६१ या काळात सासुरवास (१९४६), वहिनीच्या बांगड्या (१९५३), मीठ भाकर, सांगते ऐका (१९५९), लक्ष्मी आली घरा, मोठी माणसं आदी गाजलेल्या मराठी चित्रपटांमध्ये त्यांनी मुख्य अभिनेत्री म्हणून भूमिका साकारली. सुलोचना दीदी यांनी २५० हून अधिक मराठी-हिंदी चित्रपटांमध्ये काम केले.

सुलोचना दीदी यांनी हिंदी चित्रपटसृष्टीतही आपल्या अभिनयाची छाप सोडली. अनेक चित्रपटांमध्ये त्यांनी आईची भूमिका ताकदीने साकारली. एक चरित्र अभिनेत्री म्हणून त्यांनी आपली छाप सोडली. देव आनंद, सुनील दत्त, राजेश खन्ना, अमिताभ बच्चन आदी सुपरस्टार अभिनेत्यांच्या आईची ऑनस्क्रीन भूमिका साकारली होती. देव आनंद यांची भूमिका असलेल्या बऱ्याच चित्रपटात त्यांनी भूमिका साकारल्या आहेत. यामध्ये जब प्यार किसीसे होता है, प्यार मोहब्बत, दुनिया, जॉनी मेरा नाम, अमीर गरीब. , वॉरंट आणि जोशिला आदी चित्रपटांचा समावेश आहे. राजेश खन्ना यांच्या दिल दौलत दुनिया, बहरों के सपने, डोली, कटी पतंग, मेरे जीवन साथी, प्रेम नगर, आक्रमण, भोला भला यांचा समावेश आहे. त्याग, आशिक हूँ बहारों का आणि अधिकार आदी चित्रपटांमध्ये त्यांनी भूमिका साकारली होती तर, हिरा, झुला, एक फूल चार कांटे, सुजाता, मेहरबान, चिराग, भाई बहन, रेश्मा और शेरा आदी चित्रपटांमध्ये त्यांनी सुनील दत्त यांच्यासोबत भूमिका साकारली.

सुलोचना यांच्या अमिताभ बच्चन यांच्यासोबत काही खास आठवणी होत्या. सुलोचना दीदींच्या 'त्या' पत्राने बिग बी अमिताभ बच्चन भारावले होते. सुलोचना यांनी चित्रपटसृष्टीच्या एका पर्वाचे नेतृत्व करत प्रेक्षकांच्या मनावर राज्य केलं. अनेक मराठी आणि हिंदी चित्रपटांमधून त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. अनेक दिग्गज मान्यवरांसोबत त्यांनी काम करून त्यांच्या अभिनयाची कारकीर्द गाजवली आहे. सुलोचना यांनी अनेक सुपरस्टारसोबत अगदी महत्त्वाच्या भूमिका साकारल्या होत्या. अमिताभ यांच्यासोबत देखील सुलोचना यांनी अनेक चित्रपटांमध्ये काम केलं आहे. पण अमिताभ यांच्यासोबत सुलोचना यांची एक विशेष भावनिक आठवण आहे. अमिताभ यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी सुलोचना दीदींनी स्वतःच्या हाताने पत्र लिहिले होते. तेव्हा अमिताभ यांनी हे पत्र सोशल मीडियावर शेअर केलं होतं. अभिनय क्षेत्रातील या दिग्गज अभिनेत्यांनी कायमच प्रेक्षकांच्या मनावर राज्य केलं आहे. या आठवणी फक्त अमिताभ यांच्यासाठीच नाही तर संपूर्ण चित्रपटसृष्टीसाठी आणि त्यांच्या चाहत्यांसाठी कायम खास राहतील.

सुलोचना यांनी अमिताभ यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं होतं की, 'आज आपला ७५ वा वाढदिवस आहे, मराठीमध्ये आम्ही याला 'अमृतमहोत्सव' म्हणतो. तुम्हाला अमृताचा अर्थ तर माहीत असेलच. तुम्हाला

तुमच्या भावी आयुष्यासाठी अमृताचा आशीर्वाद मिळो, अशी मी ईश्वर चरणी प्रार्थना करते.' या पत्रात दीदींनी अनेक जुन्या आठवणींना देखील उजाळा दिला होता. त्यांनी म्हटलं होतं की, 'मला अजूनही रेश्मा आणि शेराचा गंभीर, लाजाळू छोटू लक्षात आहे. आज मी त्या लहान मुलाला मोठ्या आणि कणखर झालेले पाहत आहे.' तसेच या पत्रावर दीदींनी स्वतःची स्वाक्षरी देखील केली होती. अमिताभ बच्चन यांनी त्यांच्या फेसबुक पेजवरुन हे पत्र शेअर केले होते. त्यावेळी त्यांनी म्हटलं होतं की, 'सुलोचना जी, ज्यांनी असंख्य चित्रपटांमध्ये माझ्या आईची भूमिका साकारली आहे त्यांनी माझ्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त मला दिलेल्या शुभेच्छा या अविस्मरणीय होत्या. त्यांचे शब्द हाच माझ्यासाठी सर्वात मोठा आशीर्वाद आहे, असे अमिताभ यांनी म्हटले होते.

सुलोचना दीदी यांना १९९९ मध्ये पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात आले. वयाच्या १४ व्या वर्षी लग्न ते बॉलिवूड चित्रपटांमधील प्रवास हा सुलोचना दीदी यांचा खूप जास्त वेगळा होता. सुलोचना यांच्या सहजसुंदर अभिनयाचे प्रेक्षक कायमच चाहते राहिले आहेत. त्यांची अभिनयाबद्दलची आत्मीयता, भूमिकेवरचं प्रेम आणि प्रेक्षकांबद्दलची आत्मीयता ही कायमच वाखाणण्याजोगी राहणार आहे. त्यांची प्रत्येक भूमिका ही प्रेक्षकांच्या मनात अनंत काळासाठी राहणार आहे या अजिबात संभ्रम नाही. त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७७५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

उजनी धरण क्षेत्रात पंपगृहाच्या खोदकामासाठी स्फोट करू नका

उजनी व्यवस्थापनाच्या कार्यकारी अभियंत्यांचे आयुक्तांना पत्र

सुराज्य/सोलापूर

उजनी धरण प्रतिबंधित क्षेत्रात सोलापूर स्मार्ट सिटी अंतर्गत समांतर जलवाहिनी पंपगृहाच्या खोदकामासाठी विस्फोटन करू नये अन्यथा संबंधित मक्तेदारावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याबाबत संबंधित मक्तेदारांना आदेश द्यावेत असे सूचना पत्र उजनी धरण व्यवस्थापनच्या कार्यकारी अभियंत्यांनी महापालिका आयुक्तांना दिले आहे.

सोलापूरची जीवनदायीनी मानल्या जाणाऱ्या उजनी सोलापूर समांतर जलवाहिनीच्या कामाची वर्क ऑर्डर हैदराबाद येथील पोचमपाड कंपनीला देण्यात आली. सोलापूर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन आणि महापालिका यांच्या माध्यमातून हे काम करण्यात येत आहे. उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम ११० किलोमीटर आणि नव्या टेंडर प्रमाणे १७० एमएलडी काम करण्यात येणार आहे. येत्या १८ महिन्यात हे काम पूर्ण करण्यात येणार आहे.

वर्क ऑर्डर दिल्यानंतर संबंधित पोचमपाड कंपनीने अखेर काम सुरू केले आहे. दरम्यान जॅकवेल व जलवाहिनी टाकण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. दरम्यान, उजनी धरणाच्या भिंतीपासून ७५० मीटर अंतरावरती पाण्याकडील बाजूस उजनी (ता. माढा) हद्दीमध्ये सोलापूर स्मार्ट सिटीअंतर्गत समांतर जलवाहिनी करीता पंपगृहाच्या बांधकामासाठी खोदाई काम खाजगी अभिकरणाने सुरू केले आहे. या खोदाई कामास अनियंत्रित स्फोटकांचा वापर करत असल्याचे क्षेत्रीय पाहणी वेळी दिसून आले.

या अभिकरणाच्या(मक्तेदार प्रतिनिधी) यांना २५ मे रोजीच्या भेटीमध्ये सूचना देवून देखील अनियंत्रित पध्दतीने २६ व २७ मे २०२३ रोजी विस्फोटन केल्याचे आढळून आले आहे. तेव्हा या कामासाठी खोदकाम छिन्नी (chiselling) पद्धतीने करण्यात यावे, अन्यथा धरण भिंतीस स्फोटकांमुळे तडे गेल्यास किंवा काही हानी झाल्यास गंभीर कार्यवाही करण्यात येईल.

यापुढे विस्फोटन करण्यात येऊ नये, याबद्दल आदेश द्यावेत अन्यथा खाजगी अभिकरणावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल असे उजनी धरण व्यवस्थापन विभाग(भीमानगर)चे कार्यकारी अभियंता यांनी महापालिका आयुक्तांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

आठ दिवसांनी अधिक गतीने काम : चौबे

समांतर जलवाहिनीचे व जॅकवेल चे काम सुरू आहे. सध्या यापूर्वी राहिलेले पाईपलाईन टाकण्याचे कामही करण्यात येत आहे. आठ दिवसानंतर या कामास अधिक गती प्राप्त होईल, अशी माहिती महापालिका पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता व्यंकटेश चौबे यांनी दिली.

भालेरावच्या मारेकऱ्यांना फाशी देण्याची रिपाइंची मागणी

वेळापूर : नांदेड जिल्ह्यातील बोंडार हवेली गावामध्ये अक्षय भालेराव यांची निर्घृण हत्या करणाऱ्या गाव गुंडांना फाशीची शिक्षा व्हावी यासाठी रिपाइं माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले माळशिरस तालुका यांच्या वतीने माळशिरस नायब तहसीलदार आशिष सानप यांना निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी प महा उपाध्यक्ष एन के साळवे प. महा. सचिव दयानंद धाईंजे, युवक जिल्हा कार्याध्यक्ष किरण धाईंजे, जिल्हा नेते शामराव भोसले, तुकाराम बाबर, भारत आठवले, आबा बनसोडे ,रमेश धाईंजे, श्रीकांत सावंत, एस एम गायकवाड, तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे, सरचिटणीस मारूती खांडेकर, युवक तालुकाध्यक्ष दशरथ नवगिरे, कोषाध्यक्ष समीर सोरटे, कार्याध्यक्ष विनोद रणदिवे, अकलूज शहराध्यक्ष अजित मोरे, यंग ब्रिगेड होलार समाज संघटनेचे दादासाहेब नामदास, युवक सरचिटणीस प्रवीण साळवे, अशोक चव्हाण, भास्कर बनसोडे, राम कांबळे, अण्णासो भोसले, शेखर सावंत, मारुती शिंदे, गौतम भंडारे, सुनील ओवाळ, प्रकाश गायकवाड, सुहास बिरलिंगे, महेंद्र लोंढे, संजय भोसले व विद्यार्थी परिषद अध्यक्ष सुचित साळवे, नितीन कांबळे, महादेव सरवदे, गणेश सावंत, शरद साबळे, स्वप्निल सरवदे, अभिजीत वायमारे, माऊली भोसल , सद्दाम तांबोळी, नवनाथ माने इत्यादी उपस्थित होते.

आकाशवाणी व दूरदर्शन कर्मचारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

सोलापूर : आकाशवाणी व दूरदर्शन कर्मचारी पतसंस्थेची २५ वी वार्षिकसर्वसाधारण सभा नुकतीच पार पडली असून संस्थेला यावर्षी देखील 'अ 'दर्जा मिळाला आहे. संस्थेने गेल्या पंचवीस वर्षापासून 'अ 'दर्जा कायम ठेवल्याची माहिती चेअरमन सलीम शेख , व्हॉइस चेअरमन आनंत पुजारी व सेक्रेटरी बसवेश्वर बेडगे यांनी दिली आहे.

संस्थेचे भाग भांडवल ९९ लाख ३१ हजार रुपये तर राखीव निधी ३५ लाख ६३ हजार ४०५.५० इतका असून संस्थेने ७३ लाख लाख ४८ हजार इतके कर्ज वाटप केले असून निव्वळ नफा ११ लाख ९७ हजार ४४५.५० इतका झाला आहे. संस्थेने ९ टक्के दराने कर्ज वाटप करून सभासदांना ८ टक्के दराने लाभांश जाहीर केला आहे. यावेळेस निवृत्त सभासद किशोर दुधगीकर यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पतसंस्थेचे चेअरमन सलीम शेख ,व्हॉइस चेअरमन आनंत पुजारी, सेक्रेटरी बसवेश्वर बेडगे, नंदकुमार बेडगे, संचालक सुभाष मल्लाव, शबाना शेख, अरविंद माने, प्रमोद साळुंखे व सभासद वर्ग उपस्थित होते.

मोदींकडून समाजातील सर्वांना काही ना काही देण्याचा प्रयत्न

मुरलीधर मोहोळ यांचे प्रतिपादन

सुराज्य/सोलापूर

मोदी सरकारने गेल्या नऊ वर्षात जनतेचा विश्वास सार्थ ठरवत विविध समाज घटकांना समोर ठेवून योजना राबविल्या आहेत. सर्वांना काही ना काही देण्याचा प्रयत्न पंतप्रधान मोदी यांनी केला आहे. मोदी यांनी कायम विकासाचे राजकारण आहे, असे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश महामंत्री तथा पुण्याचे माजी उपमहापौर मुरलीधर मोहोळ यांनी पत्रकार परिषदेत केले.

भाजपच्या महा जनसंपर्क अभियानासंदर्भात सोलापूर दौऱ्यावर आले असताना मोहोळ पुढे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने गेल्या नऊ वर्षात विविध योजना यशस्वीपणे राबविल्या. जनतेचा विश्वास सार्थ ठरवला. ही सर्व कामे आणि योजना जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी भाजपाच्या वतीने ३१ मे ते ३१ जून दरम्यान अभिमान राबविण्यात येत आहे. या अभियाना अंतर्गत भाजपाचे सर्व पदाधिकारी, खासदार, आमदार हे लोकांपर्यंत माहिती पोचविणार आहेत.

भाजपचे सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते वर्षभर संघटनात्मक काम करतात. केंद्रीय मंत्री, खासदार, आमदार व कोट्यवधी कार्यकर्ते हे या महिनाभरात या अभियानांतर्गत ९ वर्षाचा लेखाजोखा लोकांपर्यंत मांडणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजातील सर्व घटकांना विचारात येऊन सर्वांना काही ना काही देण्याचा प्रयत्न करण्यात केल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यासाठी केंद्राने विविध योजनांद्वारे कोट्यवधी रूपयांचा निधी दिला आहे. काही योजनांमध्ये त्रुटी आढळल्या असतील तर त्या दूर करण्यात येतील, सोलापूरचे काही प्रश्न अनुत्तरीत आहेत, ते आपण वरिष्ठ स्तरावर निश्चित मांडू, असेही प्रदेश प्रवक्ते मोहोळ यांनी स्पष्ट केले.

ज्येष्ठ नेत्यांच्या सभा होणार

महिनाभर चालणाऱ्या या महाजनसंपर्क अभियानादरम्यान सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघात ज्येष्ठ नेत्यांचा सभाही होणार असल्याचे मोहोळ यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, भाजपाचे अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्यापैकी एकाची सभा होईल तसेच विधानसभा मतदारसंघात राज्यातील मंत्र्यांच्या सभा होतील, असे मोहोळ यांनी सांगितले.

पानगल हायस्कूलचा दहावी परीक्षेचा निकाल ९९.३७ टक्के

सुराज्य/सोलापूर

एम. ए. पानगल अँग्लो ऊर्दू हायस्कूल च्या १६१ विद्यार्थ्यांनी दहावी परीक्षा दिली त्यात १६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले व निकाल ९९.३७% इतका लागला असून त्यात प्रथम- जुनेद रियाज शेख (९५.००%), द्वितीय- मुहम्मद मुजतबा अल्ताफ हुसेन सिद्दीकी (९३.८०%),तृतीय-मुहम्मदनोमान अफरोज शेख (९२.८०%) तसेच आबिद आसिफ शेखने ९१.८०% व पटेल मुहम्मद जुनेद आझमने ९०.८०% तर समी एजाज अहमद वललम्पल्लीने ९०.६०% गुण प्राप्त केले. सदर परीक्षेत एकूण ७७ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य प्राप्त केले. ६५ विद्यार्थी प्रथम श्रेणी प्राप्त केले.

विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे, प्राचार्य डॉ. हारून रशीद अहमद बागबान , उपमुख्याध्यापिका सुरय्या जहागीरदार, मुहम्मदअली शेख, निकहत नल्लामंदू, जाकिर शाहपुरे, कमर शेख, नफिस बेग, फरझाना नदाफ, शिरीन खान, अल्ताफ सिद्दीकी, रियाज सय्यद, अकबर पठाण, मोहसीन माशाळ, मेहमूद खतीब, रियाज शेख, मो. रफिक दौलताबाद, नसरुद्दीन पीरजादे, अन्वर शेख, एजाज वल्लम्पल्ली आदींनी केले.

दिलीप जाधव

सोलापूर : माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे यांचे सासरे दिलीप महादेव जाधव ४ रोजी निधन झाले.त्यांच्यावर वाजता जुना पुना नाका ,रमशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. ६ जून रोजी सायंकाळी ६ वाजता जम्मा वस्ती, साबळे नागरी आरोग्य केंद्र जवळ येथील त्यांच्या राहत्या घरी जलदान विधी कार्यक्रम होणार आहे.

हिराबाई भिसे

मोहोळ : मोहोळ येथील नागनाथ गल्ली परिसरातील रहिवाशी असलेल्या हिराबाई मारुती भिसे यांचे रविवारी रात्री वृध्दापकाळाने राहत्या घरी निधन झाले. मृत्यू समयी त्या ८४ वयाच्या होत्या. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून व नातवंडे असा परिवार आहे.



शहर राष्ट्रवादीतर्फे भरणे यांचा सत्कार

सुराज्य/सोलापूर

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, माजी पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांचा पुणे पी. डी.सी. बँक येथे वाढदिवसा निमित्त माजी नगरसेवक किसन भाऊ जाधव यांनी सत्कार केला. यावेळी राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस चेतन गायकवाड, किरण शिंदे, वृषभ प्याटी, महादेव राठोड, ऋषी येवले, फिरोझ रंगरेज व उपस्थित ईच्छा भगवंताची मित्र परिवार उपस्थित होता. यावेळी जाधव यांनी भरणे यांना पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छाही दिल्या.

दर्जेदार आरोग्य सेवेसाठी जनतेबरोबर सुसंवाद महत्वाचा : सीईओ स्वामी

सुराज्य/सोलापूर

जनतेबरोबरच आपले सहकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांशीही सुसंवाद वाढवा. आरोग्य सेवेविषयी ज्या काही तक्रारी प्राप्त होतात त्यातील बहुतेक तक्रारी विसंवादामुळेच निर्माण झाल्या असल्याचे निदर्शनास आले आहे. जे आवश्यक आहे तेवढंच बोला, बोलण्याची पद्धत साधी व सौम्य ठेवा, असे आवाहन जि.प. सीईओ दिलीप स्वामी यांनी केले.

जिल्ह्यातील आरोग्य पर्यवेक्षक आणि आरोग्य सहाय्यक यांची संवाद कौशल्य व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा जिल्हा परिषदेच्या यशवंत सभागृहात पार पडली. त्यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी मार्गदर्शन करताना बोलत होते .

संवाद कौशल्य व व्यक्तीमत्व विकास या विषयावर बोलताना व्याख्याते जिवराज खोबरे म्हणाले की आरोग्य सहाय्यकांचे जॉब चार्ट पाहिला तर असे जाणवले की समाजात या संवर्गाला फार मोठी सेवा करण्याची संधी मिळाली आहे. यावेळी बोलताना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सोनिया बागडे म्हणाल्या की, आरोग्य सहाय्यकांचे महत्वाचे काम म्हणजे उपकेंद्र स्तरावरील आरोग्य कर्मचारी आणि वैद्यकीय अधिकारी यांच्यात दुवा साधने. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ धनंजय पाटील यांनी स्त्री भ्रुण प्रतिबंधक कायदा यावर मार्गदर्शन केले. मानसोपचार तज्ज्ञ डॉ पाटणकर यांचे ताणतणाव मुक्ती व आरोग्य रक्षण यावर मार्गदर्शन झाले. सहा. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ श्रीकांत कुलकर्णी यांचे महत्वाच्या योजना व अंमलबजावणी यावर मार्गदर्शन झाले. साथरोग विज्ञान व उद्रेक या विषयावर डॉ बिरुदेव दुधभाते सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी मार्गदर्शन केले. प्राथमिक आरोग्य केंद्र सक्षमीकरण, सादरीकरण व बौध्दिक खेळ यावर जिल्हा आयुष अधिकारी डॉ विलास सरवदे यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक जिल्हा माताबाल संगोपन अधिकारी डॉ अनिरुद्ध पिंपळे यांनी केले. सूत्रसंचलन डॉ विलास सरवदे यांनी केले तर आभार प्रदर्शन वैद्यकीय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण पथक डॉ. संगीता सोनवणे यांनी मानले.

दुचाकीसह मोबाईल चोरीचे गुन्हे उघडकीस

सोलापूर : शहर गुन्हे शाखेने दोन जणांना अटक केली असून त्यांच्याकडून दोन दुचाकी व तीन मोबाइल चोरीचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

दोन इसमविना नंबर प्लेट असलेल्या मोटार सायकलवर तोंडास कापड बांधून भरधाव वेगाने बाळे ते सोलापूर एस.टी. स्टँड कडे जात होते. त्यावेळी पथकास त्यांचा संशय आल्याने त्यांचा पाठलाग करून, त्यांना जुना पुना नाका येथे शिताफिने ताब्यात घेतले. ते विविध गुन्ह्यातील पाहिजे असलेले बसण्णा दत्तु शिंदे (वय-२७, रा. न्यू शिवाजी नगर, गोंधळे वस्ती) व संतोष संजय कांबळे (वय-२९,रा.जय मल्हार चौक, आडवा नळ) आरोपी असल्याचे स्पष्ट झाले.त्यांची झडती घेतली असता त्यांच्या ताब्यातून मोटार सायकल चोरी करण्यासाठी आवश्यक असणारे वाहनांच्या चाव्यांचा जुडगा, एक स्क्रुड्रायव्हर आदी साहित्य मिळून आले. बसण्णा हा एम.आ.डी.सी. पोलीस ठाण्याकडील ३ व जेलरोड पोलीस ठाणे कडील २ गुन्ह्यामध्ये पोलिसांना हवा आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने, पोलीस उप-आयुक्त डॉ. दीपाली काळे, सहायक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे, पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे, राजेंद्र बहिरट यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक जीवन निरगुडे, पोलीस अंमलदार वाजीद पटेल,योगेश बर्डे, बापू साठे, संजय साळुंखे, वसीम शेख यांनी केली.

अकरावी प्रवेशाबाबत आज पुण्यात बैठक

सुराज्य/सोलापूर

इयत्ता दहावी परीक्षेचे निकाल नुकतेच लागले असून अकरावी प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांची धावाधाव सुरू आहे. त्यामुळे ही प्रवेश प्रक्रिया आजपासून सुरू करण्यात येणार असल्याची माहिती माध्यमिकचे शिक्षणाधिकारी जावेद शेख यांनी दिली.

याबाबत मंगळवारी शिक्षण आयुक्तालय यांच्या समवेत पुणे येथील कार्यालयात बैठक होणार आहे. ही प्रक्रिया प्रथम द्वितीय आणि तृतीय अशा तीन टप्प्यांमध्ये होणार आहे. शिक्षण संचालकांनी ३१ जुलै पर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले असून आम्ही ती प्रक्रिया १५ जुलैच्या आतच पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत, तशा पद्धतीचे आमचे प्रयत्न राहणार असल्याचे शेख त्यांनी सांगितले.

मंगळवेढा तालुक्यातील विविध प्रश्नांसाठी समविचारी पक्षाचा मोर्चा

सुराज्य/मंगळवेढा

मंगळवेढा उपसा सिंचन योजना निधी,भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा कायमस्वरूपी योजना, महात्मा बसवेश्वर स्मारक निधी, संत चोखामेळा स्मारक या व अन्य २१ मागण्यांसाठी समविचारी पक्षाने मंगळवेढ्यात मोर्चा काढला.

मंगळवेढा उपसा सिंचन योजनेच्या निधीबाबत सुरू असलेली चालढकल थांबवून शासन स्तरावरून योजनेस मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अधिकाऱ्यांचा मनमानी व एकाधिकारशाही कारभार थांबवावा, मंजूर असलेल्या प्रशासकीय कामे जाणीवपूर्वक थांबविले आहे, ते तात्काळ करावे. भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना कायमस्वरूपी सुरू ठेवावी व उर्वरित विज बिल शासनामार्फत भरण्यात यावे, खाजगी दूध संघाने सुरू केलेल्या साठमारीला आळा घालून दुधाचे पाडले जाणारे दर पूर्ववत करून गाईस चाळीस रुपये प्रति लिटर व म्हशीस ६५ रुपये प्रतिलिटर वाढ करण्यात यावी, जनावरांच्या छावण्यांची प्रलंबित बिले तात्काळ मिळावित, म्हैसाळचे पावसाळापूर्वीचे अवतरण ताबडतोब देण्यात यावे, महात्मा बसवेश्वर स्मारकास निधी उपलब्ध करून देऊन शासकीय स्तरावर कमिटी गठीत करून कामास सुरुवात करण्यात यावी, शेतीपंपासाठी रात्री सिंगल फेज विद्युत पुरवठा सुरू करण्यात यावा, मंगळवेढा शहर प्रारूप विकास आराखडा मंजूर ठराव कायमस्वरूपी रद्द करण्यात यावा, प्रलंबित असलेल्या पिक विमा योजनेचे नुकसान भरपाई तात्काळ मिळावी व सन २०२२ मधील ऑनलाईन केलेल्या व तक्रारीची दखल न घेतलेल्यांना विमा देणे बाबत, मंजूर पिक विम्यातील तफावत तात्काळ दुर करण्यात यावी, टाऊन हॉल व नाट्यगृहासाठी मंजूर असलेल्या चार कोटींचा निधी त्वरित वितरीत करुन निविदा मंजूर करण्यात यावी, जुनी पेन्शन योजना मंजूर करण्यात यावी, शेतीपंपाचे नवीन विद्युत कनेक्शन त्वरित कार्यान्वित करण्यात यावे, मंगळवेढा तालुक्यातील अवैध धंदे तात्काळ बंद करण्यात यावेत, रोजगार हमी योजनेच्या कामाची स्थगिती तात्काळ उठवण्यात यावी, तालुक्यामध्ये एमआरईजीएस योजनेमधून नव्या विहिरीस प्रशासकीय मंजुरी तात्काळ देण्यात यावी, शेतकऱ्यांचे वीज बिल माफ करावे. या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात आला होता. दामाजी पुतळ्यापासून चोखामेळा चौक, मुरलीधर चौक ते प्रांत कार्यालयापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला होता. प्रांत कार्यालयाच्या ठिकाणी मोर्चाचे रूपांतर सभेमध्ये झाले. यावेळी सभेमध्ये राहुल शहा ,भगीरथ भालके, अजित जगताप, शिवानंद पाटील , औदुंबर वाडदेकर,चंद्रशेखर कोंडुभैरी, यांनी आपली मनोगते व्यक्त केली. या मोर्चामध्ये तानाजी खरात,नितीन पाटील, संभाजी गावकरे,भारत बेदरे,मुरलीधर दत्तू ,भीमराव मोरे, जालिंदर व्हनुटगी, सुरेश कोळेकर, दयानंद सोनगे,प्रतीक किल्लेदार,तानाजी कांबळे, ईराप्पा पुजारी ,बसवेश्वर पाटील, सोमनाथ माळी, भारत नागणे ,पप्पू स्वामी, संभाजी लवटे, सोमनाथ बुरजे आदी उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन व आभार भारत मुढे यांनी केले. मोर्चामध्ये मंगळवेढा तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी,शेतकरी, कामगार वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

SEMINAR
For Class 10th Passed Students & Parents
"DONT MISS"
''दहावी नंतर पुढे काय''
Talk on :WHAT NEXT AFTER CLASS 10 TH..
करिअर समुपदेशनातील तज्ज्ञ
Mrs. Aparna Kulkarni (IMS CBSE) | Mr Yogesh Kabir (IIT DELHI) | Mr Nagendra Singh (IIT ROORKEE & TEAM)
दि. 6 जून 2023 वेळ 5 pm
स्थळ - हिराचंद नेमचंद ॲम्फी थिएटर, पार्क चौक, सोलापूर
संपर्क -IMS IIT-JEE AND NEET ACADEMY
A D JOSHI Jr. COLLEGE SOLAPUR
8999 392 936 / 9511 687 750

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सोलापूर विद्यापीठात वृक्षारोपण

सोलापूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मुख्य अतिथी गृह आणि विद्यापीठ परिसरात १०१ वृक्षांचे रोपण करण्यात आले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, अभियांत्रिकी विभाग आणि भूशास्त्र संकुलाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात सर्वप्रथम प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. गौतम कांबळे, कुलसचिव योगिनी घारे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. शिवकुमार गणपूर, वित्त व लेखा अधिकारी श्रेणिक शाह, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, इनक्यूबेशन सेंटरचे संचालक डॉ. सचिन लढ्ढा, भूगर्भशास्त्र विभागप्रमुख डॉ. धवल कुलकर्णी, पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. विनायक धुळप, विद्यापीठ अभियंता गिरीश कुलकर्णी आदी उपस्थित होते. यावेळी या सर्व अधिकाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण झाले. यावेळी भूशास्त्र संकुलातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अभियांत्रिकी विभागातील विनोद बंडगर, प्रशांत भोसले आणि माळी कर्मचाऱ्यांचे वृक्षारोपणासाठी सहाय्य लाभले. यावेळी प्रभारी कुलगुरू डॉ. कामत यांनी ई-व्हेईकल स्वत: चालवून करत विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

सहयोग ब्राह्मण सेवा संघाच्या अध्यक्षपदी-श्रीकांत कुलकर्णी

सोलापूर : जुळे सोलापुरातील नव्याने स्थापन झालेल्या सहयोग ब्राह्मण सेवा संघाची सभा नुकतीच पार पडली. त्या सभेत अध्यक्षपदी श्रीकांत कुलकर्णी यांची सर्वानुमते करण्यात आली. संस्थेचे पुढील पदाधिकारी याप्रमाणे उपाध्यक्ष अवधुत काटीकर, उपाध्यक्ष सुप्रिया जोशी,सचिव अनिता कुलकर्णी, कोशाध्यक्ष वसंत वळसंगकर, कार्याध्यक्ष प्रकाश दिवाणजी, सहसचिव उदय कुलकर्णी, कार्यक्रम प्रमुख शशीकांत कुलकर्णी, महिला आघाडी प्रमुख संपदा जोशी, प्रसिध्द प्रमुख आरती अरगडे, कायदेशीरसल्लागार. अँड. मुकुंद कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य वैभव कुलकर्णी, अजय कुलकर्णी, वासुदेव पाठक यांची एकमताने निवड करण्यात आली.

या कार्यकारिणीचा कालावधी पाच वर्षांचा राहील. सर्व सभासदांनी नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास नारायण दुमालदार, डॉ. चंद्रकांत कुलकर्णी, यशवंत पतकी, भास्कर कुलकर्णी, विलास कौलगी, शिल्पा गोखले, सरिता कुलकर्णी आदी उपस्थित होते.

चपळगाव येथे परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

अक्कलकोट : मनिषा बहुद्देशीय ग्राम विकास संस्था संचलित रिणाति इंग्लिश मिडियम स्कूल व संतोष दादा पाटील मराठी विद्यालय यांच्या वतीने ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. चपळगाव येथे १० वी व १२वी परिक्षेमधे प्रथम क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. १०वी मध्ये प्रथम ९३.६०% मानसी प्रेमानंद मेलगेरी, १२ वीमध्ये प्रथमसोमनाथ मल्लिकार्जुन बिराजदार सायन्स विभागामधून ९१% यांनी क्रमांक पटकाविला.यावेळी शाळेचे आधारस्तंभ के. बी. पाटील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा अध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. व त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. मानसी या विद्यार्थ्यांनीच्या हस्ते वडाचे झाड लावण्यात आले. तसेच मल्लिकार्जुन याच्या हस्ते कारंजचे झाड लावण्यात आले. मुख्याध्यापक जगताप यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका रेखा पाटील यांनी केले तर सहशिक्षिका वाले यांनी कार्यक्रमाचे आभार मानले. यावेळी सुरेश सुरवसे व सावळे, धर्मसाले , आरती नडगिरे, युसरा पीरजादे उपस्थित होते.

'जिवाची होतीया काहिली' मालिका रंगतदार वळणावर

सोलापूर : सोनी मराठी वाहिनीवरील 'जिवाची होतीया काहिली' ही मालिका मराठी आणि कानडी यांच्यामधल्या प्रेमावर भाष्य करते आहे.प्रमुख नायकाच्या भूमिकेत कोल्हापूरचा रांगडा गडी,अभिनेता राज हंचनाळे प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस पडतोय. तसेच प्रतीक्षा शिवणकर हिचा कानडी अंदाज सुद्धा प्रेक्षकांना आवडतो आहे. सध्या मालिका रंगतदार वळणावर येऊन पोचली आहे.मराठी रांगडा गडी अर्जुन आणि कानडी भाषिक रेवथी यांचे लग्न कशा प्रकारे होईल,हे पाहायला प्रेक्षकांना नक्कीच आवडेल, असा विश्वास निर्मात्यांनी व्यक्त केला.

सोलापूरच्या विद्यार्थ्यांचे सायन्स ऑलिम्पियाड परीक्षेत यश

सोलापूर : जगातील सर्वात मोठे ऑलिम्पियाड सायन्स ऑलिम्पियाड फाऊंडेशन आयोजित आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाड २०२२-२३ मध्ये सोलापूरच्या दोन विद्यार्थ्यांनी सायन्स ऑलिम्पियाड परीक्षेत आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवले आहे. चतुरबाई श्राविका प्राथमिक शाळेतील इयत्ता दुसरीचा विद्यार्थी क्षीरसागर राजवीर महेश आणि लोटस इंग्लिश स्कूलमधील इयत्ता तिसरीचा विद्यार्थी शेटे नंदन यांना आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाडमध्ये आंतरराष्ट्रीय सामान्य ज्ञान ऑलिम्पियाडमध्ये प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल सुवर्णपदक आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

पाणी मागणे गुन्हा आहे का?

माढेकरांचा पाण्याच्या मागणीसाठी अधिकाऱ्यांसमोर टाहो

सिंचन भवन पुणे येथील बैठकीस माढा, करमाळा, माळशिरस तालुक्यातून लक्षणीय उपस्थिती

सुराज्य/अकलूज

पुणे सिंचन भवन येथे झालेल्या आढावा बैठकीमध्ये माढा तालुक्यातील जनतेने अक्षरशः पाण्यासंदर्भातील प्रश्नांचा पाऊस पाडला. योजना रखडलेल्या आहेत,पाणी मागितल्यावर गुन्हे दाखल होत आहेत. ३५३ चे गुन्हे दाखल करून दोन दोन महिने तुरुंगात ठेवले जात आहे. मग आम्ही जायचे कुठे? असा टाहो यावेळी माढ्यातील जनतेने अधिकाऱ्यांच्या समोर फोडला.

करमाळा, माढा, माळशिरस तालुक्यातील उजनी, कुकडी, सिना कोळगाव निरा देवघर सिंचन प्रकल्पांच्या प्रलंबित कामांबाबत कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालक अतुल कपाले यांच्याकडे आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी विनंती केली असता पुणे येथील कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यालयात संबधित प्रलंबित कामांबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

यावेळी झालेल्या बैठकीस आ.रणजितसिंह मोहिते पाटील, आ राम सातपुते,माजी आ.नारायण आबा पाटील, शिवतेजसिंह मोहिते पाटील, जलतज्ञ अनिल पाटील,माजी समाज कल्याण सभापती शिवाजीराजे कांबळे,शिवाजी बंडगर, भारतनाना पाटील, अजित तळेकर,संचालक गोविंद पवार,जगदीश अग्रवाल,

कार्यकारी संचालक अतुल कपाले, मुख्य अभियंता हनुमंत गुणाळे, मुख्य अभियंता एम टी धूमाळ,अधीक्षक अभियंता सुनंदा जगताप, कार्यकारी अभियंता संजय बोडके,अधीक्षक अभियंता धीरज खाडे, ज्ञानेश्वर बागडे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख, उपसभापती मामासाहेब पांढरे, माजी व्हाईस चेअरमन प्रकाशराव पाटील, प्रतापराव पाटील, सहकार महर्षी कारखान्याचे संचालक ड. विजय पवार आदी मान्यवरासह बहुसंख्येने तालुकावासिय नेते कार्यकर्ते बांधव उपस्थित होते.

या बैठकीत मांगी तलाव, कुकडीचे पाणी, निरा देवघर धरणाचे पाणी, सिनेवरील सिंचन योजना यासंदर्भात अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांमध्ये मोठा खल झाला . मांगी तलावाला कुकडीच्या लाभक्षेत्रात समाविष्ट करावे, दहीगाव सिंचन योजनेची अपूर्ण कामे लवकर पूर्ण व्हावीत, कुकडीचे पाणी करमाळ्याला टेल पर्यंत मिळावे, सीना कोळेगाव प्रकल्पामध्ये माढा व करमाळा तालुक्यातील नाडी, रोपळे, बिटरगाव परिसरातील गावांचा समावेश व्हावा कृष्णा - मराठवाडा प्रकल्पाच्या जेऊर बोगद्यातून करमाळा तालुक्यातील गावांना पाणी मिळावे.

> नीरा देवघर धरणाच्या पाण्यासाठी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्यापासून पाठपुरावा सुरू आहे . या योजनेसाठी माळशिरस तालुक्याला २ . ८८ टीएमसी पाणी मंजूर आहे .त्यामध्ये तालुक्यातील १४ गावांचा समावेश आहे .आता ही योजना बंदिस्त पाईपलाईन द्वारा करण्यात येणार असल्याने या योजनेचे १. १० टीएमसी पाणी शिल्लक राहणार आहे ते त्या परिसरातील बारा गावांना देण्यात यावे अशी मागणी आमदार रणजितसिंह व आमदार सातपुते यांनी लावून धरली .यासंदर्भात तत्काळ सर्वेक्षण केले जाईल असा शब्द अधिकाऱ्यांनी दिला .

सिना नदीवर आलेगाव व रीदोरे येथे बॅरेज व भिमेवर सुस्ते येथे बॅरेज बांधावे . सिना माढा सिंचन योजनेतून वंचित असलेल्या गावांना पाणी मिळावे, माढा तालुक्यातील पाण्यापासून कायम वंचित धानोरे व परिसरातील गावांना पाणी मिळावे यासाठी सर्वे करून प्रस्ताव पाठवण्याचे धोरण ठरले .जलसंपदाच्या अधिकाऱ्यांनी पाठवलेले प्रस्ताव आपण मंत्रालय स्तरावर मंजूर करून घेऊ असा शब्द आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी दिला .

आष्टी उपसा सिंचन योजना पूर्णत्वास नेण्यासाठी ४८ कोटींचा निधी मंजूर आहे .या योजनेसाठी आणखी १२५ कोटींची सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्याचे बैठकीत ठरले .माळशिरस तालुक्यात जलसंपदा विभागाकडून मेकॅनिकल सबडिव्हिजन मंजूर होण्यासाठी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील व आमदार राम सातपुते यांनी जोर धरला . त्यावर तालुक्यासाठी असे सबडिव्हिजन देण्यात येईल असे अतुल कपोले यांनी सांगितले .माळशिरस तालुक्यातील निरा व भीमा नद्यांवरील कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यासाठी नवीन बर्गे देण्यात येणार आहेत . उजनी उजवा कालव्याच्या १ ते ४३ मैलामध्ये बंदिस्त पाईपलाईन द्वारे पाणी देण्याचे ठरले .गिरझणी येथील तलावाच्या मुख्य दरवाजाचे दुरुस्तीचे काम पावसाळ्याआधी पूर्ण करण्याचा शब्द अधिकाऱ्यांनी दिला .

आसरा पुलाचे होणार रुंदीकरण; संभाजी ब्रिगेडच्या मागणीला यश

सुराज्य/सोलापूर

होडगी रोड ते विजयपूर रोडला जोडणाऱ्या आसरा रेल्वे पुलाच्या ३६ कोटी रुपये विस्तीकरणाच्या कामाचे भूमिपूजन केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यामुळे संभाजी ब्रिगेडच्या वतीने गेल्या चार-पाच वर्षापासून आसरा पुलाच्या रुंदीकरणाच्या सततच्या मागणीला यश आल्यामुळे आसरा पुलावर संभाजी ब्रिगेडच्या वतीने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रति आभार व्यक्त करण्यात आले.

जुळे सोलापूर भागाला जोडणारा रस्ता म्हणजे आसरा पूल या भागात अनेक नवीन नगरे वसाहती नव्याने वाढत असल्यामुळे वाहनांची वर्दळीमुळे हा रस्ता अरुंद पडत होता त्यातच या पुलावर तीन-चार नागरिकांच्या बळी सुद्धा गेला होता. त्यामुळे आसरा पुलाचे रुंदीकरण व्हावे म्हणून संभाजी ब्रिगेड च्या वतीने सोलापूर शहर दक्षिणचे आमदार सुभाष देशमुख, खासदार जयसिद्धेश्वर महास्वामी, रेल्वे प्रशासन, महानगरपालिका प्रशासन यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला होता.यावेळी संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, कार्याध्यक्ष अरविंद शेळके, उपशहर प्रमुख सिताराम बाबर, अविनाश रणसुरे, विनोद राठोड, श्रवण साळुंखे, सद्दाम शेख, नितीन वनमाने, भारत बडवणे, गुरूराज हाडपद, विजय बिल्लेगुरू, मल्लिकार्जुन शेवगार, तुळशीराम राठोड, लक्ष्मण चव्हाण, रमेश चव्हाण, अमोल भोसले, दत्तात्रय डिंगणे, संजय भोसले, मल्लू आकसर, गंगाराम झिपरे, विश्वनाथ माने आदी उपस्थित होते.

मोहोळच्या गुन्हे शाखेने चोरीस गेलेले दोन लाखांचे ११ मोबाइल केले जप्त

सुराज्य/मोहोळ

मोहोळ तालुक्यातील विविध ठिकाणावरून चोरीस गेलेले १ लाख ९७ हजार रुपये किंमतीचे ११ मोबाईल मोहोळ पोलिस ठाण्याच्या गुन्हे शाखेने सायबरच्या मदतीने चोरीस गेलेल्या मोबाईलचा पाठपुरावा करून ते मोबाईल जप्त करण्यात आले.

ही करवाई मोहोळ पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विनोद युगे सहा पोलिस निरिक्षक राजकुमार हूनगे पोसई सुधीर खारगे पोहे कॉ शरद ढावरे संदीप सावंत हरीष थोरात धिरज काकडे यांन केली

आता मृग नक्षत्राकडे लागले बळीराजाचे लक्ष

सुराज्य/पिलीव

रोहीणी नक्षत्र सध्या संपत आला आहे पण अद्याप कुठेही पाऊस पडला नाही.या महीन्यात मृग नक्षत्रात तरी् पाऊस पडेल का नाही तिकडे बळीराजासह सर्वच लक्ष देऊन आहेत.

माळशिरस तालुक्यासह पिलीव परीसरातील अनेक गावात सध्या भिषण पाणयाची टंचाई जाणवू लागली आहे. निरा देवघरच्या पाणयावर कॅनॉलच्या खालच्या भागात थोडी परिस्थिती बरी आहे पण इतर् भागात सध्या भिषण पाणी टंचाई आहे. सध्या दिवसभर आग ओकणारे ऊन, तापमानात झालेली प्रचंड वाढ यामुळे् पाणयाची पातळी प्रचंड खालावत चालली आहे. उन्हांची कधी नव्हे ती यंदा प्रचंड तीव्रता जाणवत आहे. कधी नव्हे ती यंदा पाणयाची भिषण टंचाई कारण गतवर्षी पाऊसमान अतिशय कमी झाला आहे. याचा परीणाम यंदा जाणवत असुन जुन महीन्यात पाऊस जर् पडला नाही तर अनेक गावांना पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो.

पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

उ. सोलापूर : पंचायत समिती उत्तर सोलापूर येथे कृषि विभागाच्या वतीने पर्यावरण दिनानिमित्त पंचायत समितीचे गट विकास अधिकारी महेश पाटील, कृषि अधिकारी आर.पी. कांबळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सहाय्यक प्रशासन अधिकारी आर.बी. वारगड, विस्तार अधिकारी (पं) ए. यु. तोडकरी, विस्तार अधिकारी (कृषि)एस.आर. राठोड,विस्तार अधिकारी (कृषि)एस.बी. पाथरवट व इतर उपस्थित होते.

बालगायक कौशल्य पवार याचा खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या हस्ते सत्कार

सुराज्य/बार्शी

येथील बालगायक कौशल्य शशिकांत पवार (वय १०) याची नुकतीच स्टार प्रवाह चॅनल वरील प्रसारित होणाऱ्या मी होणार सुपरस्टार छोटे उस्ताद - २ या रियालिटी शोच्या प्रोमो शूट व गीतगायनासाठी तसेच टॉप ३० मध्ये निवड झाली होती. अशाप्रकारे निवड होणारा या भागातील तो सर्वात लहान वयाचा व पहिलाच गायक ठरला आहे. त्याच्या या यशाबद्दल शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याच्या शुभमुहूर्तावर खासदार राजेनिंबाळकर यांनी कौशल्य व त्याच्या पालकांचा सत्कार करून अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

चि. कौशल्य बालवयापासूनच संगीत विशारद कविता पवार यांच्याकडे गीत गायनाचे धडे घेत आहे. गांधर्व मंडळ मुंबई च्या शास्त्रीय गीत गायनाच्या प्रारंभिक परीक्षेमध्ये शंभर टक्के मार्क मिळवण्याचा विक्रम देखील केला आहे. अनेक राज्यस्तरीय गीत गायन स्पर्धांमध्ये त्याने उज्वल यश मिळविले आहे.

माढ्यात प्रियदर्शनी महिला मंडळाचा अनोखा उपक्रम

सुराज्य/माढा

प्रियदर्शनी महिला मंडळाच्या वतीने नगराध्यक्षा ॲड मिनलताई साठे यांच्या नेतृत्वाखालील शहरातील वडाच्या झाडांचा वटपोर्णिमेच्या निमित्ताने वाढदिवस साजरा करून त्याच झाडांची महिलांनी पूजा केली. पाच वर्षापूर्वी वटपोर्णिमेच्या दिवशी वडाच्या झाडाचे वृक्षारोपण केल्यानंतर मंडळाच्या महिला सदस्यांनी झाडांचे सवंर्धन केले.तेव्हा पासून दरवर्षी वडाच्या झाडाचा वाढदिवस साजरा केला जातो.

मिनलताईंनी वडाच्या झाडाचे महत्व जाणून घेतले,वडाची झाडे लावण्यामागचे कारण म्हणजे वडाच्या झाडाला इतर झाडापेक्षा जास्त ऑक्सिजन चा पुरवठा जास्त प्रमाणात होतो,पाऊस खेचून घेण्याची क्षमता जास्त असते,वाढते प्रदूषण लक्ष्यात घेऊन या सर्व गोष्टींचा विचार करून मिनलताईंनी हा उपक्रम सलग पाच वर्ष राबवला .तसेच फक्त उपक्रम नुसता न राबविता त्या झाडांची जोपासना देखील करत आल्या आहेत. यावेळी माढा शहराच्या उपनागराध्यक्षा कल्पनाताई जगदाळे, माजी नगरसेविका गीतांजली देशमुख, प्रियदर्शनी महिला मंडळाच्या सदस्या अरुणा देशपांडे, वैशाली कथले, मालती शहा, दिपाली इंगळे, सरिता साठे, अनिता टिंगरे, रेहना शेख,अर्चना राऊत उपस्थित होत्या.

'माझी वसुंधरा' पुरस्कार मंद्रूप ग्रा.पं. ला प्रदान

पुरस्काराची रक्कम एक कोटी ७५ लाख

सुराज्य/सोलापूर

राज्यात महाराष्ट्र शासनाच्या वतीने माझी वसुंधरा अभियान राबविण्यात आले होते. या अभियानात सोलापुरातील दक्षिण तालुक्यातील मंद्रूप या ग्रामपंचायतीला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे. शाल, श्रीफळ, ट्रॉफी आणि एक कोटी ७५ लाख रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग महाराष्ट्र शासन यांचे वतीने माझी वसुंधरा अभियान ३.० सन २०२२=२३मध्ये राज्यात राबविण्यात आले.

अभियानामध्ये १०हजार लोकसंख्या पेक्षा अधिक लोक संख्या असणाऱ्या ग्रामपंचायत विभाग मध्ये मंद्रूप ग्रामपंचायतला राज्यात प्रथम पुरस्कार पुरस्कार मिळाला आहे.

पृथ्वी अग्नी वायू जल आणि आकाश या पंचतत्वावर आधारित विविध योजना आणि कार्यक्रम ग्रामपंचायत मंद्रूप यांनी उत्कृष्ट पद्धतीने पार पाडले आहे .

मंद्रूप ग्रामपंचायतीला मागील वर्षी दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले होते. या वर्षी पुन्हा एकदा नेटाने अभियान राबवून राज्यात पहिला क्रमांक प्राप्त केला आहे.

पुरस्कार वितरण कार्यक्रम दि.५ रोजी जागतिक पर्यावरण दिनाच्या दिवशी मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता. सदर पुरस्कार वितरण महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आले.

सोहळ्यासाठी मंद्रूप ग्रामपंचायातीचे ग्रामविकास अधिकारी नागेश जोडमोटे, सरपंच अनिता कोरे, विस्तार अधिकारी कृषी सचिन चव्हाण, महेश रगटे, माजी सभापती कृषी, पशुसंवर्धन व दुग्ध शाळा समिती आप्पाराव कोरे, उपसरपंच भगवान व्हणमने, भाग्यश्री जोडमोटे आदींच्या उपस्थित पुरस्कार वितरण झाले.

कार्यक्रमाला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी आमदार संजय गायकवाड, प्रवीण दराडे उपस्थित होते.

सोलापूर मधील मंद्रूप ग्रामपंचायत पुरस्कार प्राप्ती मागे सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, अति मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशादिन शेळकंदे तसेच गटविकास अधिकारी बाळासाहेब वाघ, नोडल अधिकारी सचिन चव्हाण, आदींचे मार्गदर्शन लाभले.

वेळापूर येथे वारकऱ्यांसाठी पाणी सोडणार

'सुराज्य'चा पाठपुरावा, वारकऱ्यांमध्ये आनंद

✔ सुराज्य/वेळापूर

वेळापूर येथे संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना सोडण्यात येणारे पाणी यावर्षीच्या पालखी सोहळ्यापासून बंद झाले होते. पण नीरा कालवा उपविभाग वेळापूर यांच्यावतीने पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांसाठी पाणी सोडण्याच्या तयारीच्या कामाला सुरुवात झाल्याने वारकऱ्यांना पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून वारकरी संप्रदायमध्ये आनंदी वातावरण निर्माण झाले आहे.

पाणी मिळवण्यासाठी सततच्या पाठपुराव्याला आले यश सावता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष व संत ज्ञानेश्वर महाराज विसावा कट्ट्याचे मालक महादेवभाऊ ताटे यांनी गेली वर्षभर वारकऱ्यांना पाणी मिळाले पाहिजे याबाबत आवाज उठवला. त्याचबरोबर महादेवभाऊ ताटे, दैनिक सुराज्यचे प्रतिनिधी महादेव जाधव तसेच स्वाभिमानी शेतकरी संघटना माढा लोकसभा अध्यक्ष कमलाकर माने देशमुख यांनी पालखी सोहळ्याच्या पाण्यासाठी पालखी तळावर आलेल्या ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा संस्थानचे प्रमुख तसेच प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे अकलूज प्रांत अधिकारी नामदेव टिळेकर व विविध विभागाचे प्रमुख अधिकारी यांच्यासमोर पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना वापराचे पाणी मिळाले पाहिजे हा प्रश्न लावून धरला होता. त्याचबरोबर सुराज्यने २५ मे च्या अंकात पालखी मुक्कामी वारकऱ्यांना मिळणारे पाणी कायमस्वरूपी बंद होण्याच्या मार्गावर या मथळ्याखाली सविस्तर बातमी प्रसिध्द करून पाणी मिळवुन देण्याकामी मोठा आवाज उठवला होता. त्या सर्व पाठपुराव्यास आता यश आले आहे .

यावर्षीपासून निरा कालवा उपविभाग वेळापूर यांच्यावतीने पालखी सोहळ्यासाठी सोडण्यात येत असलेले पाणी कायमचे बंद करण्यात आले होते. त्यामुळे संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात वेळापूर येथे मुक्कामी येणाऱ्या वारकऱ्यांच्या आंघोळीचा व वापराच्या पाण्याचा प्रश्न अवघड बनला होता. पालखी सोहळा काळात वेळापूर येथील वारकऱ्यांची आंघोळीचे व वापराचे पाणी

वेळापुर विसावा येथे वारकऱ्यांना सोडण्यात येत असलेल्या निरा कालव्याच्या भरावा टाकुन बंद केलेल्या चारीची पहाणी करताना निरा कालवा माळशिरस उपअभियंता पासलकर, सरपंच रजनिश बनसोडे,महादेवभाऊ ताटे व इतर दिसत आहेत.

सुराज्य
epaper.surajyadigital.com
25 May 2023 - Page 5

पालखी मुक्कामी मिळणारे पाणी कायमस्वरूपी बंद होण्याच्या मार्गावर

✔ सुराज्य/वेळापूर

वेळापूर तालुका माळशिरस येथे प्रत्येक वाहारात पालखी सोहळ्यासाठी लाखो वारकऱ्यांचा वाहू मुक्काम असतो या वारकऱ्यांच्या सुखाच्या आणि आरोग्यासाठी, सावत्याची ,वाचे सुपासाठी निरा कालवा पाटबंधारे उपविभाग वेळापूर यांच्यावतीने वर्षपूर्व सोडण्यात येत असलेले पाणी यावर्षी मुक्कामी पालखी सोहळ्यासाठी निरा कालवा पाटबंधारे उपविभाग वेळापूरच्यावतीने चारी पाहाण्याने पाणी सोडण्यात येणार पाटबंधारे उपविभाग वेळापूरच्यावतीने वारकऱ्यांसाठी पाणी सोडण्याच्या तयारीच्या कामाला सुरुवात झाल्याने वारकऱ्यांना पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून वारकरी संप्रदायमध्ये आनंदी वातावरण निर्माण झाले आहे.

सा प्रत्येकवार वाहारात पालखी मुक्कामी वारकऱ्यांसाठी वेळापूर वाहारात टोकरी बाजूचे जाणा देण्यात आलेले आहे. वेळापूर विसावा येथून वारकऱ्यांच्या वर्षपूर्व सोडण्यात येत असलेल्या पाण्याच्या वारकऱ्यांसाठी पाणी सोडले जाते जाता वारकऱ्यांचे पाणी पाहाणे वारकऱ्यांच्या वारकऱ्यांच्या अडचणीत पाणी सोडण्यात येणार पाटबंधारे उपविभाग वेळापूरच्यावतीने वारकऱ्यांसाठी पाणी सोडण्याच्या तयारीच्या कामाला सुरुवात झाल्याने वारकऱ्यांना पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून वारकरी संप्रदायमध्ये आनंदी वातावरण निर्माण झाले आहे.

डॉ. विजय सुरवसे यांच्या इच्छिमध्यात पालखीतळ वारकऱ्यांसाठी मोठ्याच्या वाहारात पाण्याच्या टाकी ठेवण्याचे आदेश

वेळापूर विसावा येथे वारकऱ्यांना सोडण्यात येत असलेल्या निरा कालव्याच्या भरावा टाकुन बंद केलेल्या चारीची पहाणी करताना निरा कालवा माळशिरस उपअभियंता पासलकर, सरपंच रजनिश बनसोडे,महादेवभाऊ ताटे व इतर दिसत आहेत.

कशाप्रकारे देणार याबाबतही शासनाकडून काहीही सांगितले जात नव्हते. जर निरा कालवा उपविभाग वेळापूर यांच्याकडून पाणी सोडले नसतेतर वारकऱ्यांचे आंघोळीचे, कपडे धुण्याचे मोठे हाल झाले असते.

वारकऱ्यांना पाणी देण्यासाठी कालव्याची चारच शिल्लक नसल्याने वारकऱ्यांचे पाणी कायमस्वरूपी बंद होण्याच्या मार्गावर होते. ह्या महत्त्वाचा प्रश्नावर प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी नीरा कालवा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना धारेवर धरून तुमच्या चुकांमुळे वारकऱ्यांना पाणी मिळणार नाही, असे चालणार नाही चार दिवसात वारकऱ्यांना पाणी देण्यासाठी कालव्याची सोय करावी असे आदेश दिले होते.

दिनांक ५ जून २०२३ रोजी निरा कालवा उप अभियंता माळशिरस पासलकर यांनी वेळापूर येथे येऊन वारकऱ्यांना पाणी सोडण्यात येत असलेल्या कालव्याच्या चारेची पाहणी केली व विसावा येथे कालव्याची चार दगडे लावून बंद केली होती ती चार त्वरित सुरू करण्याचे आदेश नीरा कालवा उपविभाग वेळापूरचे राऊत यांना दिले. त्याचबरोबर डॉ. विजय सुरवसे यांच्या पाठीमागे असलेली पाणी सोडण्याची चार स्वच्छ करण्याचे आदेश दिले.

यावेळी वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे , सावता परिषदेचे प्रदेशाध्यक्ष महादेवभाऊ ताटे, बहुजन मुक्ती पार्टीचे प्रदेश प्रवक्ते काकासाहेब जाधव , स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माढा लोकसभा अध्यक्ष कमलाकर माने देशमुख, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष युवराज मंडले, महेंद्र साठे, पिनू येडगे, ओंकार माने देशमुख, ग्रामपंचायत सदस्य अमृतराव माने देशमुख, कल्याणराव माने देशमुख, स्वाभिमानीचे सचिन पवार आदी. उपस्थित होते.

झाडे लावून मोडनिंबमधे पर्यावरण दिन साजरा

✔ **मोडनिंब** : झाडे लावून मोडनिंब मधे पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. वनविभाग,रोटरी क्लब ऑफ मोडनिंब व राष्ट्रीय हरित सेना यांच्या संयुक्त विद्यमाने ५ जून जागतिक पर्यावरण दिन मोडनिंब उजनी कॉलनीमधे वृक्षारोपन करुन साजरा करण्यात आला. यावेळी रोटरी अध्यक्ष डॉ प्रशांत कोल्हे,सचिव डॉ शशिकांत वागज,वनपाल प्रकाश पवार कृषी पर्यवेक्षक संतोष सुर्वे, हरित सेना समन्वय तानाजी इंगळे,वनरक्षक सुधीर पोळ,औदुंबर पाटील, गणेश आवटे, बालाजी जाधव यांच्या सह हरित सैनिक उपस्थित होते. वर्षभर विविध पर्यावरण पुरक उपक्रम साजरे उरलेल्या कॉलनीमधील जागेवर झाडे लागवड करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे डॉ प्रशांत कोल्हे यांनी यावेळी आभार मानताना सांगितले.

स्वेरीत 'अॅश्रे मेंबरशीप अँड करीअर अपॉर्चुनीटीज' या विषयावर सेमिनार

✔ **पंढरपूर** : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली अॅश्रे मेंबरशीप अँड करीअर अपॉर्चुनीटीज' या विषयावर एक दिवशीय सेमिनार नुकताच संपन्न झाला.

अॅश्रे पुणे चॅप्टरच्या प्रेसिडेंट अनुश्री रिसवडकर, प्रेसिडेंट इलेक्ट. यश कारखानीस व इनबाक (आयएनबीएसी) संस्थेच्या प्रेसिडेंट सखी चंद्रायन हे याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. 'अमेरिकन सोसायटी फॉर हिटींग, रेफ्रिजरेटींग व एअर कंडिशनींग' या आंतरराष्ट्रीय संयटनेची एक विद्यार्थी शाखा स्वेरी मध्ये २०१९ सालापासून कार्यान्वित आहे. सखी चंद्रायन यांनी आयुष्यात यशस्वी होण्यासाठी लागणाऱ्या जीवन कौशल्यांवर' महत्वपूर्ण भाष्य करताना म्हणाल्या की तांत्रिक माहिती बरोबरच प्रोब्लेम सॉल्विंग, कम्युनिकेशन व कॅरेक्टर ह्या गोष्टी आयुष्यात खूप उपयोगी पडतात.' अॅश्रे स्वेरी स्टुडंट ब्रँचचे विद्यार्थी शुभम यमगार व आकांक्षा शेळके यांनी प्रास्ताविक करून सूत्रसंचालन केले तर ब्रँचचे मार्गदर्शक प्रा.दिग्विजय रोंगे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

अक्षय भालेरावची हत्या करणाऱ्या गावगुंडावर कडक कारवाईची मागणी

✔ **मोहोळ** : नांदेड जिल्ह्यातील बोंढार या गावातील भीमसैनिक अक्षय भालेराव याची हत्या करणाऱ्या जातीवादी गावगुंडांवर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशा मागणीचे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया युवक आघाडीच्या वतीने मोहोळ तालुका अध्यक्ष तात्यासाहेब उर्फ मार्तंड काळे यांच्या नेतृत्वाखाली मोहोळचे तहसीलदार प्रशांत बेंडसे यांना देण्यात आले. निवेदनाद्वारे रिपाई युवक आघाडीचे मोहोळ तालुका अध्यक्ष तात्यासाहेब उर्फ मार्तंड काळे यांच्या नेतृत्वाखाली खाली करण्यात आली यावेळी सोलापूर जिल्हा खजिनदार विठ्ठल क्षिरसागर पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष हनुमंत कसबे ज्ञानेश्वर उघडे पोपट कापुरे सुनील जवंजाळ रजनीश कसबे आबासाहेब कुचेकर शहाजी मस्के बाबा कसबे सुनील शिवशरण बाळासाहेब सुतकर अमोल जगताप अंकुश शेंडगे मोहन जवंजाळ महेश कुचेकर शिवाजी चंदनशिवे आदी सह कार्यकर्ते उपस्थित होते.

म्हाडा कॉलनीत १० वी १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा यथोचित सत्कार

✔ **अक्कलकोट** : बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या म्हाडा कॉलनीतील इ. १२ वी चे विद्यार्थी सुयश कदम, संप्रिता खुने,विनायक स्वामी, दर्शन तेलीकोणे, रमेश लवटे तर इ.१० वी चे विद्यार्थी प्रतिक भरमशेट्टी, अथर्व खुने, कु.धनश्री नरूणे, नितेश मोरे, अभिषेक कुंभार, संकेत शिंदे, रोहीत पवार, या विद्यार्थ्यांचा म्हाडा सोसायटीकडून सत्कार करण्यात आला.

पुढील शैक्षणिक वाटचाल ही स्पर्धात्मक असून त्यासाठी जिद्द, चिकाटी व कष्ट करण्याची तयारी ठेवावी असे शासकीय निवासी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. करजगीकर यानी मार्गदर्शन करताना सांगितले यावेळी सोसायटीचे अध्यक्ष मलकप्पा भरमशेट्टी, उपाध्यक्ष सिद्रामप्पा पोमाजी,संचालक चौडप्पा कुंभार, संचालक दिलीप कदम, हन्नूर प्रशालेचे मुख्याध्यापक विलास बिराजदार, सेवानिवृत्त शिक्षक नारायण मोरे,अरविंद कुलकर्णी दादा, बसवराज खुने, परमेश्वर किणगे, ड अनिल पाटील, डॉ करजगीकर, राजु नरोणे, प्रकाश पाटील, दत्तात्रय टोणगे, जगन्नाथ जाधव आदी प्रतिष्ठीत नागरिक उपस्थित होते.

सुराज्य Classified
नोकरी विषयक
Ex. Service Man at
Valsang Toll Plaza
(Neeraj kumar)
interested Candidate
Contact at Toll Plaza.
Mob No. : 9028919046
(120623)

बेलाटी चे आर्थिक व्यवहार सील : बीडीओ यांची कारवाई

✔ सुराज्य/उ. सोलापूर

उत्तर तालुक्यातील बेलाठी ग्रामपंचायत मध्ये ११ लाख पैकी ८ लाख ७२ हजार रुपयाचा घोटाळा झाला असून सरपंच,ग्रामसेवक यांच्यावर कारवाई करावी असी मागणी नितीन गव्हाणे,विशाल वाघमारे ह्यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी दिलीप स्वामी, गटविकास अधिकारी महेश पाटील ह्यांनी केली होती.

अखेर पाटील ह्यांनी सरपंच,ग्रामसेवक ह्यांची चौकशी करणे कामी नोटीस बजावली असून.आर्थिक व्यवहार बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

गाजावाजा होताच नियोजित कामाचे मटेरियल जागेवर दिसून आले.सरपंचपती धनराज पाटील, ग्रामसेवक नितीन चौधरी यांनी खोटे ठेकेदार दाखवून,एक मेकाच्या संगनमताने काही कामे करून, तर काही कामे न करता हडप करण्याचा प्रयत्न सदस्यांनी दिलेल्या निवेदनात उल्लेख करण्यात आल्याने बेलाठी ग्रामपंचायत खाते सील करण्यात आले आहे. सरपंच व ग्रामसेवक ह्यांना नोटीस बजावण्यात आली आहे असे गटविकास अधिकारी महेश पाटील ह्यांनी सांगितले आहे.

मोहोळसह जिल्ह्यातील सेतू कार्यालये सुरु करावी

ज्योती क्रांती परिषदेच्या विद्यार्थी आघाडीची मागणी

✔ सुराज्य/मोहोळ

मोहोळसह जिल्ह्यातील सेतू कार्यालये बंद आहेत. ती त्वरीत सुरु करावीत या मागणीसाठी ज्योती क्रांती परिषदेच्या विद्यार्थी आघाडीच्या वतीने मोहोळ तहसिल कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले.

सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुका स्तरावरील सेतू कार्यालय बंद आहेत. त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणामध्ये गैरसोय होत आहे.शिवाय या महिन्यापासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत आहे. दहावी बारावी पास झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षासाठी वेगवेगळ्या स्वरूपांच्या



दाखले घेण्याकरता प्रचंड मोठ्या प्रमाणामध्ये गैरसोय होत आहे त्याकरता सेतू कार्यालय त्वरित सुरू करावी, या मागणीसाठी प्रदेशाध्यक्ष रमेश बारसकर यांच्या मार्गदर्शनाखाली आज ज्योती क्रांती परिषद विद्यार्थी आघाडी मोहोळ तालुक्याच्या वतीने मोहोळ तहसील कार्यालयासमोर एक दिवसीय ठिय्या आंदोलन करण्यात आले.या आंदोलनाच्या वेळी ज्योती क्रांती परिषद विद्यार्थी आघाडीचे तालुकाध्यक्ष सिध्दार्थ एकमल्ले,शहराध्यक्ष संग्राम गरड,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका उपाध्यक्ष सुरज जाधव,ज्योती क्रांती परिषदेच्या महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा संगीता पवार,दिलावर मुजावर आदींसह विद्यार्थी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

सुळेवाडी येथे विविध सामाजिक उपक्रमांनी अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

✔ सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी करणयात आली. प्रथम अहील्यादेवी होळकर यांच्या पुतळयाला पुषपहार अर्पण करून सुळेवाडी गावातुन पिलीव येथे मोटारसायकल रॅली काढण्यात आली.

पिलीव येथील बसस्थानकावरवील अहील्यादेवी होळकर यांच्या पुतळयाला पुषपहार अर्पण करून ती रली पुन्हा सुळेवाडी गावात आली.यावेळी गावात मारुती मंदीरासमोर श्री विठ्ठल दयाजी पार्टी व श्री विठ्ठल दयाजी सतोषा पार्टी या दोन्ही पार्टयांनी गजीनृत्य सादर केले. सुळेवाडी गावातील प्रवेशदवारापासुन अहील्यादेवी होळकर यांच्या प्रतीमेची सजवलेल्या रथातुन मिरवणूक काढण्यात आली. यावेळी महीलासांठी खेळ पैठणीसाठी संगीत खुर्चीचा कार्यक्रमाचे देखणे आयोजन करण्यात आले यामध्ये लहान मुलींपासुन वयोवृध्द महिलांनी सहभाग येतला.

विजेत्यांना पैठणी साडी,सोन्याची नथ,चांदीचा छल्ला बक्षीसे देणयात आली.यावेळी गुणवंत विद्यार्थी, पोलीस खात्यात भरती झालेल्यांचा व नुतन तालूका कृषी अधिकारी पदी निवड झालेल्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी व्याख्याते शरद कर्णवर यांनी अहील्यादेवी होळकर यांचा इतिहास, त्यांची सुशासन पध्दती,समाजाची सवयस्थिती,भविष्यातील दिशा यावरती मोलाचे मार्गदर्शन केले.सदर कार्यक्रमाप्रसंगी कृष्णा सुळे,खंडु सुळे,शिवराज पुकळे, अमोल मदने,खंडु माने उपस्थित होते.

यावेळी शिवराज पुकळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अहील्यादेवी होळकर जयंती पार पाडणयासाठी लखन सुळे,सुनील सुळे,धुळा झिंबल,काशीलींग सुळे,संदीप सुळे,आबा सूळे,कालीदास सुळे,विक्रम सुळे,म्हाकु सोलंकर तसेच अहील्यादेवी प्रेमी तरुण मंडळी,ग्रामस्थ यांच्या मेहनीतमुळे तसेच गावातील अधिकारी, नोकरदार, व्यावसायिक ग्रामस्थ या सर्वांनी मोलाचे सहकार्य केल्यामुळे यंदा सुळेवाडी येथे जयंती मोठ्या थाटामाटात व विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आल्याचे मत हनुमंत सुळे यांनी व्यक्त केले.यावेळी सुळेवाडी गावातील विविध समस्यांसाठी सतत प्रयत्नशील असणारे युवा नेते विक्रम सुळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

मोहोळ तालुक्यात वादळाचा तडाखा

✔ सुराज्य/चिखली

मोहोळ तालुक्यातील चिखली, हिवरे, यावली आदी परिसरासह अन्य भागात दि ४ रोजी तुफान वादळाचा जोरदार तडाखा बसल्याने चांगलीच धांदल उडाली.

दि ४ रोजी दुपारी चारच्या सुमारास मोहोळ तालुक्यातील चिखली, हिवरे, यावली आदीभागासह अन्य भागात अचानक चक्री वादळाचा जोरदार तडाखा बसल्याने अनेकांच्या घरांवरावरचे पत्रे उडून गेले. तर काही ठिकाणी विजेचे खांब कोलमडून पडून विजेच्या तारा तुटून पडल्याने विज पुरवठा खंडित झाल्याच्या घटना घडल्या. तर काही ठिकाणी केळीच्या बागा देखील जमिनदोस्त झाल्या आहेत. जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच मान्सून पावसाच्या आगमनापूर्वीच तुफान वादळाने सुरुवात केल्याने तालुक्यातील अनेक भागातील नागरिकांची चांगलीच धांदल उडाली असून. या अचानक आलेल्या चक्रीवादळामुळे अनेकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

माढा शेटफळ रस्त्यावरील अपघातात एकाचा मृत्यू

ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची शिवसेनेची मागणी

✔ सुराज्य/माढा

माढा शेटफळ रस्त्याच्या कामाची मुदत संपूनही वेळेवर काम पूर्ण न केल्याने आणि रस्त्यावरील खड्ड्यामुळे नुकत्याच झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला .यामुळे या कामाच्या ठेकेदारावर आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकार्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी माढा शहर शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

माढा पोलीस स्टेशनला या मागणीसाठी एक निवेदन देण्यात आले आहे.

यामध्ये माढा शेटफळ रस्त्याच्या कामासाठी व दर्जासाठी अनेक वेळा आंदोलने झाली.काम अतिशय संथ गतीने आणि निकृष्ट दर्जाचे होत असल्याने अनेक संघटन आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी आंदोलने करूनही या रस्त्याचे काम पूर्ण झाले नाही.रस्त्यात पडलेल्या खड्ड्यामुळे अनेक अपघात यापूर्वीही झाले आहेत.

दरम्यान ३ जून रोजी झालेल्या अपघातात एक व्यक्ति जागेवर मयत झाला तर काही जण गंभीर जखमी झाले आहेत.

रस्त्याचे काम वेळेत पूर्ण न करणे आणि योग्य दर्जाचे न केल्यामुळेच हा अपघात झाला असून ठेकेदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकार्यांना यासाठी जबाबदार धरून त्यांचेवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी माढा शहर शिवसेना प्रमुख देविदास उर्फ भैय्या खरात यांनी केली आहे. ता मागणीचे निवेदन माढा पोली स्टेशनला दिले असून यावेळी युवासेना उपजिल्हा प्रमुख सत्यम लोंढे माढा शहर युवा सेना प्रमुख स्वप्निल खरात रासपचे जिल्हा संपर्क प्रमुख गोरक वाकडे सामाजिक कार्यकर्ते नागनाथ कदम आदिं उपस्थित होते.

संतप्त शेतकऱ्यांनी चेन्नई -सूरत ग्रीनफिल्ड हायवेचे काम बंद पाडले

✔ सुराज्य/अक्कलकोट

बहुचर्चित चेन्नई सुरत ग्रीनफील्ड हायवेचा वाद दिवसेंदिवस चिघळत चालला आहे.बाधित शेतीच्या मोबदल्यात अत्यल्प मोबदला जाहीर करून शासनाने आमची चेष्टा केली आहे,आणि कल्पना न देता या प्रकल्पाचे काम सुरू असून हे काम आम्ही कोणत्याही परिस्थितीत होऊ देणार नाही या भूमिकेतून संतप्त झालेल्या बाधित शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन सोमवारी अक्कलकोट तालुक्यातील इटगे,ब्यागेहळळी परिसरात चालु असलेले ग्रीनफिल्ड हायवेचे काम बंद पाडले.

बाधित शेतीच्या मोबदल्यात चार लाखांपासून सात लाखांपर्यंत भरपाई शासनाने जाहीर केली आहे.मात्र ही भरपाई बाधित शेतकऱ्यांना मंजूर नाही.याबाबतीत गेल्या सहा महिन्यांपासून अक्कलकोट, दक्षिण सोलापूर,उत्तर सोलापूर, आणि बार्शी येथील बाधित शेतकरी संतप्त झाले आहेत. मात्र अद्यापही बैठक न झाल्याने शेतकऱ्यांच्या भावना दिवसेंदिवस तीव्र होत चालल्या आहेत.

मागील महिन्यात सोलापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयाचे उद्घाटन करण्यासाठी आलेले उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना संघर्ष समितीचे अध्यक्ष बाळासाहेब मोरे,महेश हिंडोळे, सुरेखा होळीकट्टी आणि बार्शीचे अध्यक्ष ओमप्रकाश पाटील यांनी प्रत्यक्ष भेट येऊन बाधित शेतीच्या संदर्भात प्रश्न मार्गी लावावा याविषयी थेट विचारणा केली होती.

असे असूनही अजूनही बैठकीच्या संदर्भात प्रशासकीय स्तरावरून कोणत्याही प्रकारची हालचाल न झाल्याने बाधित शेतकऱ्यांच्या भावना दिवसेंदिवस तीव्र होत आहेत. संघर्ष समितीचे अध्यक्ष बाळासाहेब मोरे, बसवराज होळीकट्टी,प्रियंका दोड्याळे, परमेश्वर गाढवे, विकी गाढवे, अमोल वेदपाठक, महेश भोज, चेतन जाधव, श्रीशैल धनशेट्टी, सरदार धनशेट्टी आदींसह चपळगाव, धोत्री, बोरेगांव, डोंबरजवळगे, तीर्थ, हालहळळी(अ), चपळगाववाडी, दहिटणेवाडी, कोन्हाळी, अक्कलकोट ग्रामीण, हसापुर, इटगे, नागुर, बोरीउमरगे, मैंदर्गी, नागुर, दुधनी गावांतील बाधित शेतकरी यावेळी उपस्थित होते.

शेतकऱ्यांनी योग्य केले: सिद्धाराम म्हेत्रे

सोमवारी बाधित शेतकऱ्यांनी ग्रीनफिल्ड हायवेचे काम बंद पाडले,त्यांनी योग्य केले.केंद्रातील व राज्यातील भाजपचे नेते शेतकऱ्यांबद्दल आव आणून कळवळीने बोलतात.पण प्रत्यक्षात असे नाही.बाधित शेतकऱ्यांना अत्यल्प मोबदला देऊन शासनाने नरड्यावर पाय ठेवले आहे.आता बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळावा अशी अपेक्षा आहे.

वडवळ येथे दोन दुचाकींची धडक; १ ठार २ महिला जखमी

✔ **सुराज्य/सोलापूर** : -दोन मोटरसायकलींची समोरासमोर धडक झाल्याने एक दुचाकी चालक ठार तर दोन महिला गंभीर जखमी झाल्या. हा अपघात वडवळ (ता.मोहोळ) येथे सोमवारी सकाळच्या सुमारास घडला.

अप्पासाहेब जनार्दन मोरे (वय ५२ रा. वडवळ ता.मोहोळ) असे मयत झालेल्या दुचाकी चालकाचे नाव आहे. ते आज सकाळी सात वाजेच्या सुमारास आपल्या दुचाकीवर कोमल मोरे आणि छाया सुतार दोन महिलांना घेऊन वडवळ ते रामहिंगणी येथे शेतीच्या कामासाठी निघाले होते.

मच्छिंद्र वाघमोडे यांच्या शेताजवळ समोरुन एमएच२०-एएम- ४१५२ या क्रमांकाची दुचाकी धडकल्याने तिघेही जखमी झाले होते. त्यापैकी आप्पासाहेब मोरे आणि कोमल मोरे (वय २६ रा.वडवळ) यांना सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता अप्पासाहेब हे उपचारापूर्वी मयत झाले.या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

महत्त्वाचे वृत्त

येरवडा कारागृहात कोयता गँगची दहशत

पुणे : येरवडा भागात कोयता गँगने दहशत माजविल्याची घटना घडली. तरुणाचा पाठलाग करुन त्याच्यावर कोयत्याने वार केल्याची घटना घडली. या प्रकरणी पाचजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रतिक नाईकनवरे, चिकू नाईकनवरे, अभिषेक बडे, श्री पाटोळे, प्रियांशू वैरागर (सर्व रा. गांधीनगर, येरवडा) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत अभिजीत अप्पासाहेब दुशिंग (वय ४०, रा. गांधीनगर, येरवडा) यांनी येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

कांदाप्रश्नी प्रहारचे मुंडन आंदोलन

नाशिक : सततचा पाऊस, गारपीट, ढगाळ वातावरण, त्यामुळे येणारी रोगराई यामुळे कांद्यावर मूळ उत्पादन खर्चाच्या तुलनेत दुप्पट खर्च होत आहे. कांद्याचे सातत्याने दर कमी होत असतानाही उपाययोजना केल्या जात नसल्याने प्रहार संघटनेच्या वतीने येवला येथे शेतकऱ्यांनी मुंडन आंदोलन केले. आंदोलनकर्त्यांनी आपली भूमिका मांडली आहे. अथक प्रयत्न करून नैसर्गिक संकटातून वाचविलेल्या कांद्यास सहा महिने उत्पादन खर्च भरून निघेल इतपतही दर सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांमुळे मिळत नसल्याने शेतकरी देशोधडीला लागला आहे. शेतकऱ्यांसाठी विरोधी पक्ष शिल्लकच राहिला नसून जो तो आपापली सत्ता,मत्ता कशी शाबूत राहील, यातच धन्यता मानत असल्याचे प्रहार संघटनेने म्हटले आहे. मुंडन आंदोलनाद्वारे शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांकडे लक्ष वेधण्यात आले.

बिहारमध्ये एमआयएमला रोखण्यासाठी काँग्रेसचा नवा चेहरा

नवी दिल्ली : एमआयएम पक्षाला बिहारमध्ये रोखण्यासाठी काँग्रेसने आपल्या नेतृत्वात बदल केला आहे. कटिहार जिल्ह्यातील कडवा मतदारसंघातून दोन वेळा आमदार राहिलेले आणि जेएनयू विद्यार्थी संघाचे माजी अध्यक्ष शकील अहमद खान यांना काँग्रेसने विधीमंडळ पक्षाचे नेते म्हणून घोषित केले आहे. भागलपूरचे आमदार अजित शर्मा यांना हटवून खान यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शेवटच्या वेळी २००० साली काँग्रेसने फुरकान अन्सारी या मुस्लीम नेत्यावर ही जबाबदारी सोपविली होती. बिहारमधील सीमांचर प्रदेशात मुस्लीम बहुल मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी काँग्रेसकडून खान यांची विधीमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली असल्याचे सांगितले जाते. मागच्या अडीच दशकापासून खान सीमांचल प्रदेशात चांगले सक्रीय आहेत. कटिहार, पुर्निया, अरारीया आणि काशीगंज हे जिल्हे येतात.

पिंपरी चिंचवडचे नाव बदलून जिजाऊनगर ठेवा!

पिंपरी : चिंचवड शहराचं नाव बदलून जिजाऊ नगर ठेवण्यात यावं अशी मागणी भक्ती शक्ती प्रतिष्ठानकडून करण्यात आली आहे. या आशयाचे फलक पिंपरी- चिंचवड शहरातील विविध भागात लावण्यात आल्याचे पाहायला मिळत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक दिनाच्या औचित्य साधून ही मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील अनेक शहरांची नावे बदलण्यात आलेली आहेत. आता पिंपरी-चिंचवड शहराचे देखील नाव बदलण्याची आग्रही भूमिका भक्ती शक्ती प्रतिष्ठानकडून घेण्यात येत आहे. शहरातील विविध भागात पिंपरी-चिंचवड शहराचे जिजाऊ नगर नाव करण्यात यावे अशी मागणी आता जोर धरू लागलेली आहे. शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी भक्ती शक्ती प्रतिष्ठानकडून पिंपरी चिंचवड शहराचे जिजाऊ नगर नाव करण्यात यावे यासाठी फ्लेक्स लावण्यात आले आहेत.

कोल्हापूर विमानतळाचे नाव ठरले

कोल्हापूर : कोल्हापूर विमानतळाला छत्रपती राजाराम महाराज यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी गेल्या कित्येक वर्षांपासून होत आहे. ही मागणी आता लवकरच पूर्ण होणार असून विमानतळाला छत्रपती राजाराम महाराजांचे नाव देण्याचा प्रस्ताव लवकरच केंद्रीय मंत्रिमंडळासमोर मांडण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी दिले आहे. ते आज कोल्हापुरात पत्रकार परिषदेत बोलत होते. पत्रकार परिषदेला खासदार धनंजय महाडिक, खासदार अपराजिता सारंगी, महानगर जिल्हाध्यक्ष राहूल चिकोडे, महिला जिल्हाध्यक्ष शौमिका महाडिक उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांच्या गाडीला वाळूमाफियाचा कट

बीड : महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये वाळू माफियांनी हैदोस घातला आहे. अशातच बीडमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. जिल्ह्यात वाळू वाहतूक करणाऱ्याने थेट जिल्हाधिकाऱ्यांच्याच वाहनाला कट मारला. यावेळी थोडक्यात अपघात टळला असला तरी या घटनेची जिल्ह्यात चांगलीच चर्चा रंगत आहे. सदर वाळू माफियाचा काही किलोमीटर अंतरापर्यंत पाठलाग केल्यानंतरही तो हाती लागला नाही. मात्र त्यानंतर जिल्हाधिकार्यांनी पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना फोन करून या टिप्परचालकाला तात्काळ अटक करण्यात यावी, अशा सूचना दिल्या आणि त्यानंतर या चालकाच्या हाती बेड्या पडल्या आहेत.

लिफ्ट मागणे जीवावर बेतले

धाराशिव : दारुचे व्यसन एखाद्याला कुठल्या स्तरापर्यंत घेऊन जाऊ शकते, याचा प्रत्यय देणारी एक घटना शहरापासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या गड देवधर पाटी येथे नोव्हेंबर २०२१ मध्ये घडली होती. तिघा आरोपींनी दारुच्या व्यसनापायी २३ वर्षीय तरुणाचा निर्घृणपणे खून केला. त्यानंतर मयत तरुणाला नग्न अवस्थेत गवतात टाकून त्यांनी पोबारा केला होता. याच गुन्ह्यातील मुख्य आरोपीच्या मुसक्या आवळण्यात धाराशिव पोलिसांना जवळपास दीड वर्षांनी यश आलं आहे.

वाहनातून एटीएम यंत्र पळविले

नाशिक : लासलगाव ते विंचुर रस्त्यावर असलेल्या क्सिस बँकेचे एटीएम यंत्र चोरट्यांनी वाहनातून पळवून नेल्याची घटना रविवारी मध्यरात्री घडली. पोलिसांनी नाकाबंदी करून संशयित वाहनाचा पाठलाग केला असता चोरट्यांनी एटीएम यंत्र पोलिसांच्या गाडीवर फेकत पोबारा केला. लासलगाव- विंचुर रस्त्यावर क्सिस बँक असून एटीएम बँकेलगतच्या गाळ्यात आहे. रविवारी मध्यरात्री चोरट्यांनी एटीएम यंत्र काढून सोबत आणलेल्या वाहनातून पळवून नेले. या घटनेचा प्रकार एटीएममधील सीसीटीव्हीत कैद झाला. या घटनेनंतर पोलिसांनी नाकाबंदी केली. पोलिस नाईक योगेश शिंदे, सुजित बारगळ यांनी एका खासगी गाडीद्वारे चोरट्यांचा पाठलाग केला असता चोरट्यांनी एटीएम यंत्र नाशिक-छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील बोकडदरे शिवारात पोलिसांच्या खासगी गाडीवर फेकून पलायन केले.

ठाण्यात मनसे-भाजपात जुंपली

ठाणे : घोडबंदर येथील डोंगरीपाडा टेकडीवरील नागरिकांना जाणवत असलेल्या पाणी टंचाईच्या मुद्द्यावरून सुरू झालेल्या आरोपप्रत्यारोपामुळे मनसे आणि भाजपमध्ये जुंपल्याचे चित्र आहे. झोपी गेलेले जागे झाले, अशी टिका भाजपचे स्थानिक माजी नगरसेवक मनोहर डुम्बरे यांनी मनसेवर केली आहे तर, नागरिकांना आमिष दाखविण्यासाठी पाण्याच्या टाकीचे भुमीपुजन उरकले का, असा प्रश्न उपस्थित करत मनसेचे ठाणे शहराध्यक्ष रविंद्र मोरे यांनी डुम्बरे यांना प्रतिउत्तर दिले आहे. ठाणे महापालिका निवडणुकीच्या तोंडावर हा वाद आणखी वाढण्याची चिन्हे आहेत.

मंत्रिमंडळ विस्ताराचा फॉर्म्युला ठरला

डेंजर झोनमधील मंत्र्यांना डच्चू; नव्या चेहऱ्यांना संधी

सुराज्य/मुंबई

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीत महाराष्ट्रातील मंत्रिमंडळ विस्ताराबाबत चर्चा झाल्याची माहिती आहे. शिवसेनेच्या वर्धापन दिनापूर्वी मंत्रिमंडळ विस्तार करावा, अशी मागणी शिंदे यांनी केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शिवसेनेचा वर्धापन दिन १९ जून रोजी असतो, त्यामुळं विस्तार होणार का याकडे लक्ष लागलं आहे. मंत्रिमंडळ विस्तार करताना भाजपच्या महाराष्ट्रातील मिशन ४५ ला फायदेशीर ठरतील अशा नेत्यांना मंत्रिमंडळात स्थान दिलं जाण्याची शक्यता आहे. एका खाजगी वृत्तवाहिनीनं याबाबत वृत्त दिलं आहे.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री दिल्लीत होते, अमित शाह यांची काल त्यांनी भेट येतली. एकनाथ शिंदे यांना शिवसेनेचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करायचा आहे. यावेळचा मंत्रिमंडळ विस्तार करताना भाजप मिशन ४५ डोळ्यासमोर ठेवणार आहे. लोकसभा निवडणुकीत फायदेशीर ठरतील अशा नेत्यांना मंत्री म्हणून संधी दिली जाण्याची शक्यता आहे.

सध्याच्या मंत्रिमंडळात कार्यरत असणारे ज्येष्ठ नेते समाधानकारक कामगिरी करु न शकल्यानं त्यांना डच्चू दिला जाण्याची शक्यता असल्याची देखील माहिती समोर आली आहे.

मंत्रिमंडळ विस्तार नेमका कधी होणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. मंत्रिमंडळ विस्तार करताना नव्या आमदारांना देखील संधी दिली जाण्याची शक्यता असल्याचं बोललं जात आहे.

शिंदे गटाच्या खासदारांना केंद्रात २ मंत्रिपदे मिळणार?

एकनाथ शिंदे यांच्यासोबत शिवसेनेचे १३ खासदार आहेत. केंद्रीय मंत्रिमंडळात फेरबदल होणार, अशी चर्चा गेल्या काही महिन्यांपासून सुरु आहेत. त्या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्रिमंडळात फेरबदल झाल्यास शिंदे यांच्यासोबत असलेल्य खासदारांपैकी दोन नेत्यांना मंत्रिपदाची लॉटरी लागू शकते. शिवसेना २०१९ पूर्वी एनडीएमध्ये होती तेव्हा त्यांच्याकडे एक कॅबिनेट मंत्रिपद होतं. मात्र, सध्या शिवसेना हाच एनडीएमधील भाजप नंतरचा सर्वात मोठी मित्र पक्ष आहे. त्यामुळं आगामी केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारात दोन मंत्रिपदं शिंदे समर्थक खासदारांना मिळणार का हे पाहावं लागेल. एकनाथ शिंदे यांच्या सोबत असलेल्या खासदारांपैकी बुलढाण्याचे खासदार प्रतापराव जाधव यांच्या नावाची चर्चा यापूर्वी झाली होती.

अजितदादा भडकले

...नाहीतर एकेकाच्या कानाखाली आवाज काढीन

सुराज्य/पुणे

पुणे जिल्ह्याच्या मुळशी तालुक्यातील पदाधिकाऱ्यांना अजित पवार यांनी आपल्या खास शैलीत खडसावले आहे. मुळशी तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्या अंतर्गत गटबाजीला पाहता सोमवारी पदाधिकारी मेळाव्यामध्ये अजित पवार यांनी थेट कानाखाली मारण्याचा इशारा दिला आहे. मुळशी तालुक्यातील माजी नगरसेवक सुनील चांदरे आणि बाबा कंदारे यांच्या एका लग्नात टोकाचं वाद पेटला होता. याची चर्चा मुळशी तालुक्यात गाजली होती. हाच प्रसंग लक्षात घेता सोमवारी पदाधिकारी बैठकीत अजित पवार यांनी थेट पद दिलेल्या पदाधिकाऱ्यांना काम करा, नाहीतर एकेकांच्या कानाखाली वाजवील, असा थेट इशारा दिला आहे. मात्र, भरसभेत अशा प्रकारचं वक्तव्य केल्यामुळे पदाधिकारी नाराज झालेत का, याबाबत आम्ही तिथल्या इतर पदाधिकाऱ्यांसोबत बातचीत केली आहे.

अजित पवार नेमके काय म्हणाले?

राष्ट्रवादीचा २४ वा वर्धापन दिन पूर्ण होऊन आपण २५ व्या वर्धापन दिनामध्ये प्रवेश करत आहे. याचा विचार तुम्ही सगळ्यांनी करायचा आहे. पुणे जिल्ह्याच्या भोर, वेल्हा, मुळशी येथील सगळे पदाधिकारी आले आहेत. मुळशीच्या लोकांनी पण काम करायचे आहे. मुळशीच्या लोकांना पदं दिलेली आहेत, म्हणून भांडायचं नाही. नाहीतर एक एकांचा कानाखाली आवाज काढीन. याच्यातून तुमची नाही आमची बदनामी होते. पवार साहेबांची बदनामी होते. हा कुठला फाजीलपणा चालला आहे, अशा शब्दांत अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या संबंधित पदाधिकाऱ्यांना फैलावर घेतले.

आगामी काळात विदर्भात राष्ट्रवादीची ताकद वाढली पाहिजे. महाराष्ट्राचे शिल्पकार, माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी व्यापक समाजहिताचे राजकारण केले. तेच राष्ट्रवादीला अभिप्रेत आहे. भविष्यात सत्ताकारणात नवे चेहरे देण्याचा राष्ट्रवादीचा प्रयत्न आहे. परंतु राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनीसुद्धा लोकांच्या संपर्कात राहावे. तसेच जातनिहाय जनगणना करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी सतत लावून धरली पाहिजे, असे आदेशही अजित पवार यांनी दिले.

मिरवणुकीत औरंगजेबाचा फोटो; फडणवीस संतापले

सुराज्य/अहमदनगर :

अहमदनगरच्या मुकुंदनगरमध्ये एका उरूसानिमित्त निघालेल्या मिरवणुकीत तरुणांनी औरंगजेबाचा फोटो झळकविला. याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर त्यावर प्रतिक्रिया उमटत आहेत. उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही याची गंभीर दखल घेतली आहे. हे सहन केले जाणार नाही, जर कुणी औरंग्याचं नाव घेत असेल तर त्याला माफी नाही, असे फडणवीस यांनी म्हटले आहे. भाजपचे आमदार नीतेश राणे यांनीही यावर संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.

रविवारी रात्री फकिरवाडा परिसरात हजरत दमबाहरी हजरत यांच्या उर्सनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीत औरंगजेबचे पोस्टर झळकविल्याचा प्रकार समोर आला आहे. शहरातील मुकुंदनगर परिसरातून चादर अर्पण करण्यासाठी मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीत काही जण औरंगजेबचा फोटो असलेले फलक घेऊन नाचत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या प्रकरणी चौकशी सुरू असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. याचे पडसाद राज्यातही उमटले असून वातावरण तापण्यास सुरुवात झाली आहे. यावर फडणवीस म्हणाले, औरंगजेबाचा फोटो झळकविला जाणे कदापी सहन केले जाणार नाही. असे कृत्य कोणी तरीत असेल तर ते मान्य केले जाणार नाही. कोणी औरंग्याचं नाव घेत असेल तर त्याला माफी नाही,' असेही फडणवीस म्हणाले आहेत.

बेकायदा गॅस विक्री जीवावर बेतली; १५ वर्षीय मुलीचा मृत्यू

सुराज्य/पुणे : सिंहगड रस्त्यावरील किरकटवाडी भागात एका किराणा माल दुकानात बेकायदा स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरची विक्री करणे जीवावर बेतले असून, गॅस गळतीमुळे गंभीर भाजलेल्या १५ वर्षीय मुलीचा ससून रुग्णालयात उपचारादरम्यान सोमवारी मृत्यू झाला. दुर्घटनेत किराणामाल दुकानदारासह त्याची लहान मुलगी गंभीर भाजले आहेत. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

गीता मन्नाराम चौधरी (वय १५, रा. प्रेम सुपर मार्केट, माळवाडी, किरकटवाडी, सिंहगड रस्ता) असे मृत्युमुखी पडलेल्या मुलीचे नाव आहे. तिचे वडील मन्नाराम चौधरी (वय ४५) आणि लहान बहिणीवर ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. चौधरी यांचे किरकटवाडी भागातील माळवाडी येथे किराणा माल विक्रीचे दुकान आहे.

रिलायन्स दरोड्यात १४ कोटींची लूट

सुराज्य/सांगली : सांगलीतील रिलायन्स ज्वेल्स दुकानातून भरदिवसा सशस्त्र दरोडा टाकून १४ कोटींचे दागिने, हिरे, जवाहिरे अज्ञातांनी लंपास केल्याचे रात्री उशिरा स्पष्ट झाले असून दरोडेखोरांनी वापरलेली मोटार मिरजेपासून १७ किलोमीटर अंतरावरील भोसे यल्लम्मा मंदिराजवळ सोडून देण्यात आल्याचे आढळून आले. पोलिसांच्या हाती अद्याप काहीही ठोस माहिती मिळालेली नसली तरी टोळीने मंगळवेढ्याच्या दिशेने धूम ठोकल्याची प्राथमिक माहिती उपलब्ध झाली आहे.

रविवारी दुपारी सांगली-मिरज रस्त्यालगत असलेल्या रिलायन्स ज्वेल्स या अलंकाराच्या दुकानावर अज्ञात दरोडेखोरांनी कर्मचाऱ्यांना बांधून लूट केली. रात्री उशिरा लूट कितीची झाली याची माहिती समोर आली असून रोकडसह १४ कोटी ६९ हजार ३०० रूपयांची लूट केली असल्याचे स्पष्ट झाले. दूरचित्रीकरणात काही दरोडेखोरांचे चेहरे स्पष्ट झाले असून टोळीने गुन्ह्यात वापरलेली मोटार (एमएच ०४ ईटी ८८९४) सोलापूर मार्गावरील भोसे गावच्या हद्दीत यल्लम्मा मंदिरामागे एका शेतात बेवारस स्थितीत सोडण्यात आली असल्याचे सोमवारी सकाळी दिसून आले. मात्र, मोटारीचा नोंदणी क्रमांक बनावट असल्याचे चौकशीत दिसून आले. या मोटारीत एक गावठी पिस्तुल, कपडे पोलिसांच्या हाती लागले असून चोरट्याचा शोध घेण्यासाठी सात पथके तैनात करण्यात आली आहेत.

समृध्दी महामार्गावर अपघाताची तीव्रता कमी होणार

नाशिक : राज्याच्या विकासाचा मार्ग म्हणून ओळख असलेल्या नागपूर मुंबई समृध्दी महामार्गावर वाढत्या अपघाताच्या घटना पाहता आता या अपघातांची तीव्रता रोखण्यासाठी 'समृध्दी'वर आता 'इम्पॅक्ट एटेन्युएटर' चा वापर करण्यात येणार आहे. नाशिक ते शिर्डी महामार्गाच्या दुसर्या टप्प्यातील १२२ स्ट्रक्चरवर असे एकूण २४४ इम्पॅक्ट एटेन्युएटर्स बसविण्यात आले आहेत.

ऐक्याचे प्रतीक; पालखी रथाला मुस्लीम कारागीर देतायेत चकाकी

सुराज्य/देहू : जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा १० जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. त्यापूर्वी रथाला चकाकी देण्याचे काम करण्यात येत आहे. मुस्लिम बांधव (कारागीर) रथाला आणि पालखीला चकाकी देण्याचं काम दरवर्षी करतात. पालखी सोहळा म्हटलं की सर्वधर्म समभाव असा संदेश दिला जातो त्याच एक उदाहरण असल्याचे पाहायला मिळते.

घनश्याम गोल्ड यांच्याकडून दरवर्षी तुकोबांच्या पालखी, रथाला चकाकी देण्याचे काम करण्यात येतं. मोठ्या श्रद्धेने मुस्लीम कारागीर रथाला चकाकी देण्याचे काम करतात. गेल्या सात वर्षांपासून हे काम अविरतपणे सुरू असल्याची माहिती कारागीरांनी दिली आहे. जातीच्या पलीकडे जाऊन हे काम करण्याचा एक वेगळा अनुभव आणि त्याच समाधान असल्याचं कारागीर सांगतात. चिंचेचे पाणी, रिटा, सोडा आणि लिंबू पाणी याचा वापर करून रथाला चकाकी आणण्यात येते. लाखो वारकऱ्यांचं देहू हे श्रद्धास्थान आहे. दरवर्षी लाखोच्या संख्येने आषाढी वारी निमित्त महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून वारकरी देहूत दाखल होतात, यावर्षी मोठ्या संख्येने वारकरी उपस्थित राहतील, असे सांगण्यात येत आहे.

मुंबईतल्या घराचे दार नेहमीच उघडे असायचे

सुराज्य/कोल्हापूर

सीमाभागातील कर्नाटकातून मावशीसोबत कोल्हापुरात आलेल्या सुलोचना दीदी यांची नंतर कोल्हापूर हे माहेर तर जयप्रभा स्टुडिओ कर्मभूमी ठरली.

अनेक वर्षे भालजी पेंढारकर, मास्टर विनायक यांच्यासह अनेक दिग्गज निर्माते व दिग्दर्शकांसोबत काम करताना कोल्हापूरविषयी त्यांच्या मनात प्रचंड आपुलकी निर्माण झाली. त्यामुळे हिंदी सिनेमात संधी मिळत गेल्याने हा परिसर सोडला तरी कोल्हापूरवरचे प्रेम, आपुलकी मात्र कायम राहिले. या शहराविषयी त्यांच्या मनात नेहमीच प्रेमाची भावना राहिल्याने कोल्हापूरकरांनाही त्या नेहमी आपली लेक वाटायची.

आईवडिलांच्या निधनानंतर खडकलाट येथून सुलोचना दीदी मावशीबरोबर कोल्हापुरात आल्या. फारसं शिक्षण नसले तरी त्यांना अभिनयाची आवड होती. यातून मा. विनायक यांच्याकडे त्या काम करू लागल्या. पण मोठी भूमिका मिळत नसल्याने नंतर त्या भालजी पेंढारकर यांच्याकडे आल्या. गुरू म्हणून भालजी भेटल्यानंतर त्यांच्या कारकिर्दीस जोमाने सुरूवात झाली. जयप्रभा स्टुडिओ कर्मभूमी ठरली आणि सिनेमांची रांग लागली.

सासूरवासपासून सुरू झालेला त्यांच्या अभिनयाचा प्रवास कोल्हापुरात मीठ भाकर, मराठा तितुका मेळवावा, जीवाचा सखा, साधी माणसं अशा अनेक चित्रपटाच्या माध्यमातून पुढे कायम राहिला. साधारणता पंधरा वर्षाहून अधिक काळ त्या येथील लक्ष्मीपुरी येथे राहत होत्या. त्यांचे मुळ नाव वेगळे होते. पण त्यांचे बोलके डोळे पाहून भालजींनी त्यांना सुलोचना हे नाव दिले. तेच नाव पुढे कायम राहिले. भालजींच्या तालमीत तयार झालेल्या सुलोचना दीदी नंतर हिंदी चित्रपटाच्या निमित्ताने पुणे, मुंबईला गेल्या. पण त्यांचे कोल्हापूरवरील प्रेम कधीच कमी झाले नाही.

कोल्हापुरात भालजी पेंढारकर सांस्कृतीक केंद्र होण्यासाठी त्यांनी मोठे प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नाला यश आले. त्यांनी कोल्हापूर चित्रनगरीसाठीही प्रयत्न केले. मुंबईतील त्यांचे निवासस्थान म्हणजे कोल्हापुरातील सिनेव्यावसायिकांना हक्काचे घर वाटायचे. कुठे रहायची सोय नसेल तर कलाकार, तंत्रज्ञ त्यांच्या घरीच उतरायचे.

२० जुलै रोजी त्यांचा वाढदिवस होता. त्यांच्या चित्रपट कारकिर्दीवर शैलेश शेट्टी यांनी एक माहितीपट काढले आहे. त्याचे प्रदर्शन वाढदिवसादिनी त्यांच्याच हस्ते करण्याचे नियोजन केले होते. पण रविवारी अचानक दीदींचे निधन झाले. पण त्या दिवशी या माहितीपटाचे प्रदर्शन करणार असल्याचे शेट्टी यांनी सांगितले.

सुलोचना दीदींनी कांचन या एकमात्र कन्येला जन्म दिला तो कोल्हापुरात. या काळात त्यांच्या अनेक चित्रपटांचे चित्रीकरण सुरू होते. जयप्रभात स्टुडिओमध्ये हे चित्रीकरण चालत असत. कांचन यांना जरी जन्म दिलेला असला तरीही चित्रीकरण करणे हे त्यांना अत्यावश्यक होते. कांचन या लेकीला जन्माला घालून त्या ओल्या बाळंतीण असतानाही बाळाला घरी ठेवून इतरांच्या स्वाधीन करून स्वतः त्या परिस्थितीत चालत जयप्रभात स्टुडिओला चित्रीकरण करण्यासाठी जात होत्या. त्याही जैन गल्ली ते जय प्रभात स्टुडिओ त्यांचं हे कष्टप्रद जगणं बघून गल्लीतल्या बायका आश्चर्याने त्यांच्याकडून पहात असत.

कन्या, सखी, पत्नी, आई अशा विविध भूमिका साकारताना अभिनयाच्या सामर्थ्यावर त्या प्रेक्षकांच्या अंत:करणापर्यंत पोहोचायच्या. त्यांच्या भूमिका म्हणजे मांगल्य आणि पावित्र्याचे प्रतिक होते. काही प्रसंगाचे चित्रीकरण सुरू असतानाही त्यांचा अभिनय पाहून सेटवरील लोकही हळवे व्हायचे. त्यामुळे कोल्हापुरात तब्बल पंधरा वर्षे राहून अभिनयाचा प्रभाव दाखवला. त्यातून त्या कर्नाटकातील असूनही कोल्हापूरवासी झाल्या. हे शहर त्यांचे माहेरघर झाले. म्हणून तर शेवटच्या क्षणापर्यंत त्यांचा या शहराशी ऋणानुबंध कायम राहिला. कोल्हापूरला जायचे म्हटले तरी त्यांची प्रकृती

खा.महास्वामी म्हणतात, लवकरच विमानसेवा सुरू होईल

पत्रकार परिषदेत मांडला पंतप्रधानांच्या ९ वर्षांच्या कारकिर्दीचा लेखाजोखा

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूरसाठी विमानसेवा गरजेची आहे. त्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. सोलापुरातून लवकरात लवकर विमानसेवा सुरू होणार आहे. शहर - जिल्ह्यातील सर्वांसाठी ही आनंदाची बाब असणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही याबाबत सांगितले आहे. त्यादृष्टीने प्रकिया सुरू असल्याचे खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी यांनी सांगितले. पण निश्चित कधी विमानसेवेस प्रारंभ होईल यावर त्यांनी ठोस उत्तर दिले नाही.

मोदी सरकारच्या नववर्षपूर्ती निमित्त आयोजित पत्रकार परिषदेत खासदार डॉ.जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी यांनी मोदी सरकारच्या ९ वर्षातील कामांचा लेखाजोखा मांडला, त्यावेळी पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी भाजपचे प्रदेश महामंत्री तथा पुण्याचे माजी उपमहापौर मुरलीधर मोहोळ, आ. सुभाष देशमुख, आ. विजयकुमार देशमुख, शहराध्यक्ष विक्रम देशमुख, शशिकांत चव्हाण, रुद्रेश बोरामणी आदींची उपस्थिती होती.

खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य यांनी मोदींच्या ९ वर्षातील कामगिरीचा आढावा घेताना नऊ वर्षात १४४ विमानतळाची निर्मिती करण्यात आल्याचे सांगितले. त्यावर सोलापूर विमानतळाबाबत पत्रकारांनी विचारल्यावर मात्र त्यांना ठोस असे उत्तर देता आला नाही.

देशभरात जन औषधी योजनेंतर्गत ९ हजार ३०० दुकाने उघडली. स्वच्छ भारत मोहिमे अंतर्गत ११.७२ कोटी शौचालय बांधली, उज्वल महिला गॅस योजनेतून ४.६ कोटी मोफत गॅस कनेक्शन, मातृत्व रजा १२ आठवड्यावरून २६ आठवडे केली, जन आरोग्य योजनेतून आतापर्यंत ४.४४ कोटी नागरिकांवर उपचार, पंतप्रधान मोदी आवास योजनेंतर्गत ३५ कोटी पेक्षा जास्त परिवारांना पक्के घरे दिली. अन्नधान्य योजना ८० कोटी जनतेला मोफत राशन देण्यात येत आहे. नऊ वर्षात ३.५३ लाख किलोमीटर ग्रामीण भागात रस्ते पूर्णकेले. घर घर नल - हर घर जल योजनेअंतर्गत ११.६६ कोटी कुटुंबांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली. स्मार्ट सिटी योजनेंतर्गत शंभर शहरांचा विकास केला यासह विविध कामे करण्यात आल्याचे ते म्हणाले. सोलापूर - हैदराबाद महामार्गाचे काम सुरू आहे. त्याला अधिक गती मिळत आहे. स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत झालेल्या कामानसंदर्भात मीटिंग घेऊन चर्चा करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

प्रत्येक पैसा गरीब कल्याणासाठी वापरला : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली २०१४ पासून ९ वर्षात सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणासाठी विविध योजना राबविण्यात आल्या आहेत. मोदी मिशन अंतर्गत प्रत्येक पैसा गरीब कल्याणासाठी वापरण्यात येत आहे, असे स्पष्टीकरण खासदार महास्वामी यांनी पत्रकार परिषदेत दिले.

सोलापूर जिल्ह्यात ही झाली कामे

केंद्र सरकारच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यात विविध कामे पूर्ण करण्यात आली तर काही कामे प्रस्तावित आहेत. यामध्ये प्रधानमंत्री आवास शहरी योजनेंतर्गत शहरात आठ हजार तर ग्रामीण भागात २२ हजार ४९७ घरे उपलब्ध करण्यात येत आहेत. पी.एम. स्वनिधी योजनेअंतर्गत २२ हजार ४९७ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. दोन लाख ३९ हजार ७५१ लाभार्थ्यांना मुद्रा योजनेअंतर्गत एकूण १ हजार ६७३ कोटी रुपये कर्जवाटप करण्यात आले आहे. पी.एम. किसान सन्मान निधी योजने अंतर्गत सहा लाख ४० हजार हून अधिक लाभार्थ्यांच्या खात्यात सहा हजार रुपये प्रत्येकी अनुदान देण्यात आले. रे नगर प्रकल्पासाठी ३० हजार घरांचा प्रकल्प पूर्णत्वास येत आहे. स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत एकूण ४७ प्रकल्पांपैकी ४१ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. सुमारे ९९५ कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात आली. सोलापूर शहरातील दोन उड्डाणपूल कामाची प्रक्रिया सुरू आहे. भारत नेट प्रोजेक्ट च्या माध्यमातून ११ तालुक्यातील १हजार ०२८ ग्रामपंचायतींना इंटरनेट सुविधा पुरविण्यात आल्या आहेत, असेही खासदार डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी यांनी सांगितले.

आषाढी यात्रा कालावधीत ड्रोन कॅमेऱ्याद्वारे छायाचित्रण करण्यावर बंदी

शमा पवार यांचे आदेश

✔ सुराज्य/सोलापूर

पंढरपूर आषाढीवारी यात्रेच्या पार्श्वभूमिवर सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात २०. जून ते ४ जुलै २०२३ या कालावधीत पालखी सोहळ्याच्या संपूर्ण मार्गावर व पंढरपूर येथील आषाढी वारीमध्ये ड्रोन कॅमेराद्वारे छायाचित्रण करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये अपर जिल्हादंडाधिकारी शमा पवार यांनी आदेश काढले आहेत.

सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात महत्वाची धार्मिक स्थळे, धरणे, केंद्रीय संस्था असून वरिष्ठ कार्यालयाकडून वेळोवेळी आलेल्या सुचनेनुसार तसेच गोपनीय माहितीनुसार दहशतवादी कारवायामध्ये ड्रोन कॅमेराद्वारे टेहाळणी होऊन त्याचा अतिरेकी कारवायामध्ये उपयोग केला जाण्याची शक्यता असते. त्यामुळे या आषाढी वारी कालावधीत संत श्री ज्ञानेश्वर महाराज, संत श्री तुकाराम महाराज, संत श्री निवृत्तीनाथ महाराज, संत श्री सोपानदेव महाराज, संत श्री नामदेव महाराज, संत श्री एकनाथ महाराज, संत मुक्ताबाई व संत श्री गजानन महाराज या मानाच्या पालख्या पायी चालत पंढरपूरच्या दिशेने येणार आहेत. त्यांच्यासोबत महाराष्ट्रातून व इतर प्रांतातून लाखो भाविक वारकरी येत असतात. २८ जून .२०२३ रोजी पंढरपूर येथे सर्व पालख्या एकत्र येतात. त्यावेळी पंढरपूर येथे भाविक/वारकऱ्यांची १२ ते १४ लाख एवढी असते. लाखो भाविक मंदिर तसेच मंदिर परिसरात एकाच ठिकाणी एकवटलेले असतात. सदर ठिकाणी विशेषत: वेगवेगळ्या नदी घाटावर सोलापूर जिल्ह्यातून येणाऱ्या सर्व पालखी मार्गावर बरेच टी.व्ही. चॅनल्स, खाजगी व्यक्ती, संस्था यांच्याकडून पालखी सोहळ्याचे छायाचित्रण होत असते. त्यामुळे अलिकडील काळातील दहशतवादी घटनांचा विचार करता पालखी सोहळ्यात ड्रोन कॅमेऱ्याद्वारे छायाचित्रण होऊन त्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदर पालखी सोहळ्यात व आषाढीवारी कालावधीत येणाऱ्या भाविक/वारकऱ्यांमध्ये जास्तीत जास्त भाविक/वारकरी हे ग्रामीण भागातील असून त्यांना ड्रोन कॅमेरा माहित नसतो. त्यामुळे अचानक ड्रोन सारख्या साधनांद्वारे जर छायाचित्रण करण्यात आले तर वारकऱ्यांमध्ये अफवा पसरुन गोंधळ उडून चेंगराचेंगरीसारखा प्रकार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ही बंदी घालण्यात आली आहे. पंढरपूर येथील आषाढीवारीमध्ये ड्रोन कॅमेराद्वारे छायाचित्रण करण्यावर बंदी घालण्यात येत आहे. हा आदेश सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण हद्दीत पोलीस आयुक्तालय हद्द वगळून व सर्व नगरपालिका हद्दीत लागू राहणार आहे.

जिल्हास्तरीय लोकशाही दिनात ५७ अर्ज प्राप्त

पालकमंत्री आणि मुख्यमंत्री सचिवालय कक्षातील अर्ज कार्यवाहीसाठी पाठवण्याचे आदेश

✔ सुराज्य/सोलापूर

जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हास्तरीय लोकशाही दिनी एकूण ५७ निवेदने प्राप्त झाली आहेत. यापैकी २१ अर्जदार यांनी समक्ष भेटून निवेदन सादर केले.

निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांच्या अध्यक्षतेखाली सेतू हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय येथे झालेल्या या लोकशाही दिनास तहसीलदार सर्वसाधारण अंजली कुलकर्णी, तहसीलदार करमणूक शाखा एन. एच वाकसे, परिविक्षाधीन तहसीलदार तुषार शिंदे तसेच संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जिल्हा लोकशाही दिनात अर्जदार गणपत महिपती भोरे (रा. मु. पो. भोसरे ता. माढा) यांनी एकत्रिकरण रद्द करुन दुरुस्तीकरणामध्ये फसवणूक केल्याबाबत दिलेल्या अर्जावर सुनावणी घेण्यात आली. याबाबत संबंधित विभाग प्रमुख जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख यांनी तात्काळ लेखी उत्तर, निर्णय अर्जदार यांना देणेबाबत निर्देश देण्यात आले. लोकशाही दिनी एकूण ५७ निवेदने प्राप्त झाली असून, यापैकी २१ अर्जदार यांनी समक्ष भेटून निवेदन सादर केले. या निवेदन कर्त्यांचे म्हणणे ऐकून संबंधित विभाग प्रमुखांना व्यक्तिशः भेटून अर्जदारांच्या अर्जावर कार्यवाही करून अडचणी सोडविण्याबाबतच्या सूचना निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी यावेळी दिल्या. तसेच वरील प्राप्त अर्जाची छाननी करून संबंधित विभागाकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्याबाबत निर्देश दिले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी मागील प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढून तसेच अर्जदार यांना आपले स्तरावरून कळविण्याविषयी सूचना दिली. तसेच माहिती अधिकार, पालकमंत्री कक्षाकडील व मुख्यमंत्री सचिवालय कक्षाकडील प्रलंबित अर्ज, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारी तात्काळ निर्गत करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यची सूचनाही त्यांनी दिली.

गोवंशीय जनावरांच्या मासची वाहतूक

✔ **सोलापूर** : रिक्षा क्रमांक एमएच.१३.जी.४८९२ यातून ४० किलो वजनाचे गोवंशीय जनावरांचे मास मुस्ताक महेबुब कुरेशी (वय-५६,रा.कुरेशी गल्ली) हा मसिहा चौकातील गफार सिद्दीकी कुरेशी (रा.मोदी) यांच्या दुकानात बेकायदेशीरपणे घेऊन जात असताना मिळून आला आहे.ही घटना ४ जून रोजी मसिहा चौक येथे सकाळी पावणे नऊ वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल महबुब कुरेशी यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. मुस्ताक कुरेशी व गफार कुरेशी यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे तपास पो. ना. जमादार करीत आहेत.

कन्हेरगाव येथे रोकड व दागिने गायब

✔ **सोलापूर** : कन्हेरगाव(तां.माढा) येथे राहणाऱ्या ज्योतीराम बबन बरगंडे यांच्या घराच्या बंद दरवाजाचे सेफ्टी लॉक आणि तसेच लोखंडी दरवाजाचे हुक तोडून चोरट्याने घरातील १ लाख ३० हजार रुपये रोख आणि ६५ ग्रॅम सोन्याचे दागिने पळविले. ही चोरी देखील शनिवारी पहाटेच्या सुमारास घडली. त्यांच्या घरा जवळ राहणाऱ्या रतिलाल मोरे यांच्या घरात देखील चोरी झाली. त्या ठीकाणी नेमका कितीचा माल गेला.हे मात्र समजले नाही. या घरफोडीची नोंद देखील टेंभुर्णी पोलिसात झाली. फौजदार सोनटक्के पुढील तपास करीत आहेत.

घरासमोरून दुचाकी पळवली

✔ **सोलापूर** : अज्ञात चोरट्याने घरासमोर पार्क करून ठेवलेली दुचाकी क्र.एमएच.१३.बीडी.४८३३ ही चोरून नेली आहे. ही घटना २० ते २१ मे दरम्यान चांदतारा मस्जिद विजापूर नाका येथे घडली.याप्रकरणी याकूब करीमसाब अत्तार (वय-५३,रा. चांदतारा मस्जिद जवळ) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल गायकवाड हे करीत आहेत.

'पोचमपाड' कंपनीने दिल्या महापालिका अधिकाऱ्यांच्या दिमतीला २ गाड्या

कामाची नियमितपणे पाहणी होणार

✔ सुराज्य/सोलापूर

११० किलोमीटरच्या समांतर जलवाहिनीच्या कामाची वर्कऑर्डर मिळाल्यानंतर पोचमपाड कंपनीने सुरू केले आहे. त्यानंतर कपंनीने महापालिका अधिकाऱ्यांच्या दिमतीला दोन गाड्या दिल्या आहेत. सोलापूरची जीवनदायीनी मानल्या जाणाऱ्या उजनी सोलापूर समांतर जलवाहिनीच्या कामाची वर्क ऑर्डर हैदराबाद येथील पोचमपाड कंपनीला देण्यात आली.

सोलापूर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन आणि महापालिका यांच्या माध्यमातून हे काम करण्यात येत आहे. उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम ११० किलोमीटर आणि नव्या टेंडर प्रमाणे १७० एमएलडी काम करण्यात येणार आहे. येत्या १८ महिन्यात हे काम पूर्ण करण्यात येणार आहे. सोलापूर स्मार्ट सिटीच्या सीईओ तथा महापालिका आयुक्त आणि पाणीपुरवठा उपअभियंता व पथकाकडून या कामाची वेळोवेळी नियमितपणे पाहणी व नियंत्रण करण्यात येणार आहे. त्यासाठी पोचमपाड कंपनीने महापालिका आयुक्तांसाठी क्रिस्टा तर उपअभियंता व्यंकटेश चौबे व पथक यांच्यासाठी स्कॉर्पिओ अशा दोन चार चाकी गाड्या दिल्या आहेत. या जलवाहिनीचे काम संपेपर्यंत या गाड्या महापालिका अधिकाऱ्यांच्या दिमतीला राहणार आहेत.

मनोरमा को ऑप. बँकेच्या चेअरमनपदी श्रीकांत मोरे

व्हा.चेअरमनपदी नागेश सुरवसे

✔ सुराज्य/सोलापूर

येथील मनोरमा को ऑप. बँकेची पंचवार्षिक निवडणूक रविवारी घेण्यात आली. त्यामध्ये चेअरमनपदी श्रीकांत मोरे यांची निवड करण्यात आली. त्यांना सूचक म्हणून दत्तात्रय मुळे आणि अनुमोदक म्हणून प्रशांत शहापूरकर होते. तर व्हाईस चेअरमनपदी संतोष नागेश सुरवसे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री. व्ही. बी. माने यांनी काम पाहिले.

निवडीसंबंधीची सभा विजापूर रोडवरील कोटणीस नगर येथील मनोरमा कॉन्फरन्स हॉलमध्ये घेण्यात आली. यामध्ये चेअरमनपदी मोरे यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्यामुळे त्यांची चेअरमनपदी निवड जाहीर करण्यात आली. तर व्हा. चेअरमनपदी संतोष सुरवसे यांची निवड एकमताने करण्यात आली. यावेळी चेअरमन श्रीकांत मोरे, व्हा. चेअरमन संतोष सुरवसे यांच्यासह नवनिर्वाचित संचालक म्हणून डॉ. सुमित मोरे, डॉ. ऋचा पाटील, गणपत कदम, सुहास भोसले, गजेंद्र साळुंके, डॉ. सत्यजित वायचवरे, दत्तात्रय मुळे, मैनुद्दिन नदाफ, बब्रुवाहन रोंगे, सौ. अस्मिता गायकवाड, शुभांगी भोसले, चंद्रकांत खरटमल, प्रशांत शहापूरकर, विकास सक्री, संतोष मोटे यांच्या अविरोध निवडीची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी व्ही. बी. माने यांनी केली. कर्मचारी प्रतिनिधी म्हणून असि. मॅनेजर नीलकंठ करंडे, असि. मॅनेजर कमलाकर पुजारी यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित सर्व संचालकांचा यावेळी चेअरमन मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मनोरमा सखी मंचच्या अध्यक्षा सौ. शोभा मोरे, डॉ. आदित्य पाटील, धनश्री मल्टिस्टेटचे प्रमुख शिवाजीराव काळुंगे, तुळजापूरचे असि. रजिस्ट्रार दत्तात्रय मोरे, नगरसेवक अमोल शिंदे, डॉ. राजशेखर शिंदे, प्रा. कल्याण शिंदे, विशेष लेखा परीक्षक श्री. डोके, बँकेच्या सीईओ शिल्पा कुलकर्णी यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. शाखाधिकारी अजय मोरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. माऊली जाधव यांनी आभार मानले.

गळफास घेतलेल्या तरुणाचा मृत्यू

✔ **सोलापूर** : देगाव येथील वानकर नगरात गळफास घेतलेला गौसपाक अल्लाउद्दीन शेख (वय ३५) हा शासकीय रुग्णालयात उपचार घेताना रविवारी रात्री मरण पावला. तो शनिवारी सकाळच्या सुमारास राहत्या घरातील किचनरूमच्या छतास असलेल्या लाकडी वाशाला दोरीने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून बेशुध्द अवस्थेत अब्बासअली (भाऊ) यांनी रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान तो काल रात्री मयत झाला. या घटनेची नोंद सलगरवस्ती पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

थकीत मोबदल्यासाठी आशा, गटप्रवर्तकांचे आंदोलन

✔ सुराज्य/सोलापूर

आशा व गटप्रवर्तकांना गेल्या पाच महिन्यांपासून राज्य व केंद्र शासनाकडून कामाचा मोबदला न मिळाल्याने शहर जिल्ह्यातील सुमारे ३ हजार आशा आणि १३६ गटप्रवर्तकांनी जिल्हा परिषद गेटवर सोमवारी आंदोलन केले.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जिल्ह्यात ग्रामीण भागात आशा व गटप्रवर्तक काम करीत असून, आशा व गटप्रवर्तक आरोग्य विभागाचा पाठीचा कणा आहे. आशा सेविकांमुळे शिशूंच्या लसीकरणाचे १०० टक्के उद्दिष्टांपर्यंत पोहचण्यात यश मिळाले आहे. तसेच संस्थात्मक प्रसूतीच्या प्रमाणात ही वाढ झाली आहे. त्याचबरोबर माता व बालमृत्यूचे प्रमाणात घट झाली आहे. शासनाच्या सर्व आरोग्य विषयक मोहिमांमध्ये आशा व गटप्रवर्तकांना महत्वाची भूमिका पार पाडली असल्यामुळे या योजनांचा लाभ तळागाळातील लोकांपर्यंत पोहचत असल्यामुळे या मोहिमा यशस्वी होत आहेत. एकीकडे शासनांच्या योजना लाभ वंचित घटकांपर्यंत पोहचविण्याचे काम आशा सेविका करीत आहेत. मात्र शासन त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप आशा सेविका करीत आहेत.

दहावीतील गुणवंत

यंदाही निकालात मुलींची बाजी

अमृता शिंपी
९७.००%
ठोकळ प्रशाला

अर्जुन देशपांडे
९३.२०%
ठोकळ प्रशाला

श्वेता लोमटे
९२.४०%
लोहारा हायस्कूल

रुतुजा सावंत
९१.६०%
न्यू इंग्लिश स्कूल

नंदिनी पवार
८७.६०%
मंगरुळे हायस्कूल अक्कलकोट

प्रिया बिलंगडी
८६.४०%
इंडियन मॉडेल स्कूल

आयुष आवताडे
८२.६०%
केटीजी आमले प्रशाला

समर्थ घुले
८१.२०%
सांगोला विद्यामंदिर

मोहिनी सोनवणे
७६.२०%
सुरवसे प्रशाला

अर्पिता सोनकांबळे
७४.००%
सुरवसे प्रशाला

रिहान सिंदगी
८७.००%
द प्रोग्रेसिव्ह उर्दू स्कूल

सागरी सदाफ
८६.६०%
द प्रोग्रेसिव्ह उर्दू स्कूल

आयेशा शेख
८६.६०%
द प्रोग्रेसिव्ह उर्दू स्कूल

नेहा अंजीखाने
६२.००%
सुरवसे प्रशाला